www.yuvakadhar.in
E mail - dainikyuvakaadhar@gmail.com
facebook : yuvakadhar

दैनिक
तरुणांचा बुलंद आवाज
# युवक आधार
मराठी




मुख्य संपादक - भारती संतोष आमले  उपसंपादक - श्री विलास मनोहर गायकवाड  कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे  निवासी संपादक- श्री राकेश जनार्दन पाटील  सह संपादक - मुकुंद कांबळे

वर्ष : २  अंक : 309  बुधवार दि. 23 जुलै २०२५  किंमत : ४ रु  पृष्ठ : ४  RNI MAHMAR/2023/89514

## अकरावीच्या दोन फेऱ्यानंतर मुंबई विभागात ३ लाख २८ हजार जागा रिक्त, मुंबईत १ लाख ४३ हजार विद्यार्थ्यांनी घेतला प्रवेश

मुंबई : अकरावी प्रवेशाच्या दोन नियमित फेऱ्यांनंतर मुंबई विभागांतर्गत असलेल्या मुंबई, ठाणे, रायगड व पालघर या चार जिल्ह्यांमध्ये १ लाख ४३ हजार ५४६ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतले. पहिल्या फेरीमध्ये ८७ हजार ५४० विद्यार्थ्यांनी, तर दुसऱ्या फेरीमध्ये ५६ हजार ६ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतले. दोन्ही फेऱ्यांमध्ये वाणिज्य शाखेमध्ये सर्वाधिक ६६ हजार ९२७ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतले. महामुंबईत असलेल्या ४ लाख ६७ हजार ७२० जागांपैकी १ लाख ४३ हजार ५४६ जागांवर प्रवेश झाले असून, अद्यापही ३ लाख २८ हजार २३४ जागा रिक्त आहेत. तर अजूनही एक लाखावर विद्यार्थी प्रवेशाच्या प्रतीक्षेत आहेत.




अकरावी प्रवेशाच्या पहिल्या फेरीला ३० जूनपासून सुरूवात झाली. मुंबई विभागातील ४ लाख ७१ हजार ७८० जागांसाठी पहिल्या फेरीमध्ये १ लाख ३९ हजार ९४३ विद्यार्थ्यांना जागा जाहीर झाल्या होत्या. यापैकी ८७ हजार ५४० विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतले. तर दुसऱ्या फेरीमध्ये ७९ हजार ४०३ विद्यार्थ्यांना जागा जाहीर झाल्या. मात्र यापैकी ५६ हजार ६ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतल्याने ३ लाख २८ हजार २३४ जागा तिसऱ्या फेरीसाठी रिक्त राहिल्या आहेत. मुंबईमधील १ लाख ९९ हजार २१० जागा, ठाण्यामधील १ लाख ५८ हजार २४०, पालघरमधील ६५ हजार २७० आणि रायगडमधील ४९ हजार ६० इतक्या जागा रिक्त राहिल्या आहेत.

अकरावीच्या दोन्ही फेऱ्यांमध्ये मुंबईतून सर्वाधिक प्रवेश झाले आहेत. यामध्ये मुंबईतून पहिल्या फेरीत ३५ हजार ८०३, तर दुसऱ्या फेरीत २७ हजार ८०७ असे ६३ हजार ६०५ विद्यार्थ्यांचे प्रवेश झाले. त्याखालोखाल ठाण्यातून ४८ हजार ४९८ विद्यार्थ्यांचे प्रवेश झाले असून, यामध्ये पहिल्या फेरीमध्ये ३० हजार ३३७ आणि दुसऱ्या फेरीमध्ये १८ हजार १६१ विद्यार्थांनी प्रवेश घेतला. रायगडमध्ये पहिल्या फेरीमध्ये ११ हजार ४३४, तर दुसऱ्या फेरीमध्ये ४ हजार ४८३ अशा एकूण १५ हजार ९१७ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतले. तर पालघरमधून दोन फेऱ्यानंतर १५ हजार ५२६ विद्यार्थ्यांचे प्रवेश झाले असून, यामध्ये पहिल्या फेरीमध्ये ९ हजार ९६६, तर दुसऱ्या फेरीमध्ये ५ हजार ५६० विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतले.

**वाणिज्य शाखेत सर्वाधिक प्रवेश**

मुंबई विभागातून वाणिज्य शाखेमध्ये सर्वाधिक ६६ हजार ९२७ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतले. पहिल्या फेरीमध्ये ३८ हजार ३५३ विद्यार्थ्यांनी, तर दुसऱ्या फेरीमध्ये २८ हजार ५७५ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतले. त्याखालोखाल विज्ञान शाखेत ५८ हजार ८६ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतले. यामध्ये पहिल्या फेरीत ३६ हजार ८२९, तर दुसऱ्या फेरीत २१ हजार २५७ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतले. दोन फेऱ्यानंतर कला शाखेमध्ये १८ हजार ५३३ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतले. यामध्ये पहिल्या फेरीमध्ये १२ हजार ३५९ विद्यार्थ्यांनी, तर दुसऱ्या फेरीमध्ये ६ हजार १७४ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतले.

## जिल्हा परिषद शाळा कामथे नं.२ (हरेकरवाडी) या शाळेला संगणक संच प्रदान

**दैनिक युवक आधार**
**योगेश सुतार चिपळूण प्रतिनिधी** -- तालुक्यातील कापरे गावचे सुपुत्र संभाजी सखाराम साळुंखे उपशाखाप्रमुख, भायखळा (उबाठा) यांनी आपले वडील कै. सखाराम तुकाराम साळुंखे यांच्या स्मरणार्थ संगणक संच देण्याची इच्छा व्यक्त केली होती. जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांसाठी हा संच दिला जावा या हेतूने संगणक संच प्रदान करण्याची जबाबदारी पुरोगामी संघटनेची जिल्हा नेते प्रदीप पवार यांच्याकडे दिली होती. त्याप्रमाणे जिल्हा परिषद शाळा कामथे नं. २ या शाळेला सदर संगणक प्रदान करण्यात आला. या कार्यक्रमासाठी जिल्हा परिषद शाळा कामथे नं.२ चे शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष महेश गावडे , ग्रामपंचायत कामथे खुर्दच्या सरपंच सरस्वती हरेकर , माजी उपसरपंच ज्ञानदेव उदेग, माजी ग्रामपंचायत सदस्य संतोष उदेग, एलआयसी प्रतिनिधी श्रीकांत गुडेकर, ग्रामपंचायत सदस्या केतकी हरेकर तसेच सर्व ग्रामपंचायत सदस्य व शाळा व्यवस्थापन समिती सदस्य या कार्यक्रमासाठी उपस्थित होते. प्रारंभी शाळेचे मुख्याध्यापक बजरंग गुरसाळे यांनी सर्वांचे स्वागत केले.संगणक संच प्रदान



करण्यात आल्यानंतर प्रदीप पवार यांनी मनोगत व्यक्त केले. संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शाळेतील पदवीधर शिक्षक यशवंत पेढांबकर यांनी केले. हा कार्यक्रम संपन्न करण्यासाठी शाळेतील शिक्षिका ऋतुजा गायकवाड व निधी जावळे यांनी मेहनत घेतली.



**दैनिक युवक आधार** - महाराष्ट्र राज्याचे लाडके मुख्यमंत्री मा.श्री.देवेंद्रजी फडणवीस साहेबांना वाढदिवसाच्या मनःपूर्वक शुभेच्छा!"तुम जिओ हजारो साल,साल के दिन हो पचास हजार"शुभेच्छुक:सय्यद अकबर(प्रदेश उपाध्यक्ष,भाजपा अल्पसंख्याक मोर्चा,महाराष्ट्र)

## ग्रामविकास अधिकारी सुधीर चव्हाण यांचा राज्यस्तरीय ग्रामसमृद्धी पुरस्काराने सन्मान

**दैनिक युवक आधार**
**महाराष्ट्र प्रतिनिधी**

उरण तालुक्यातील चाणजे ग्रामपंचायतीचे ग्रामविकास अधिकारी सुधीर बबन चव्हाण यांना "ग्रामसमृद्धी सन्मान-2025" या राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले असल्याने सर्व स्थरांतून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.नालंदा ऑर्गनायझेशन या संस्थेच्या वतीने राज्यभरातून ग्रामविकासातील उल्लेखनीय कार्य करणाऱ्या अधिकाऱ्यांची निवड करण्यात आली. यामध्ये सुधीर चव्हाण यांनी पोलादपूर तालुक्यातील लोहरे गावासाठी केलेल्या कार्याची विशेष दखल घेऊन त्यांना हा सन्मान देण्यात आला आहे..

हा पुरस्कार शनिवार, दि. 19जुलै रोजी पुण्यातील एस. एम. जोशी सभागृह, नवी पेठ येथे मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. सुधीर चव्हाण यांच्या या यशामुळे उरण तालुक्यातील ग्रामविकास विभागात आनंदाचे वातावरण असून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. ग्रामविकासात सातत्याने नवनवीन उपक्रम राबवणाऱ्या चव्हाण यांची ही कामगिरी इतरांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.



## शिरळ- वैजी- भोम मार्गावर तब्बल २२ वर्षांनी धावली लालपरी

**दैनिक युवक आधार**
**चिपळूण (प्रतिनिधी):-** -तालुक्यातील शिरळ-वैजी-भोम या मार्गांवर आमदार भास्कर जाधव, स्थानिक लोकप्रतिनिधी आणि ग्रामस्थांच्या विशेष प्रयत्नानंतर तब्बल २२ वर्षांनी शुक्रवारी लालपरी धावली. राज्य परिवहन महामंडळाच्या येथील मध्यवर्ती बसस्थानकातून सकाळी ८ वाजता सुटलेल्या या बसच्या मार्गावर ठिकठिकाणी ग्रामस्थ, लोकप्रतिनिधींकडून स्वागत करण्यात आले.



सुमारे २२ वर्षांपूर्वी या मार्गावर सुरू असलेली बससेवा अपेक्षित प्रवासी संख्या नसल्याने आणि मुख्य रस्त्याच्या दयनीय अवस्थेची कारणे देत चिपळूण आगाराने बंद केली होती. मात्र याचा जास्त त्रास या मार्गावरील असणाऱ्या रेहेळ ग्रामस्थांना व विद्यार्थ्यांना होत होता. शालेय मुलांना आणि कामानिमित्त चिपळूणला येणाऱ्यांना ३ कि. मी.ची पायपीट करावी लागत होती.

दरम्यान, या रस्त्याचे यावर्षी पंतप्रधान ग्राम सडक योजनेतून डांबरीकरण, रुंदीकरण झाल्यानंतर पुन्हा बससेवा सुरू व्हावी यासाठी बळीसम मोरे, शिवसेना विभागप्रमुख नितिन निकम, उपविभाग प्रमुख फैयाज शिरळकर, रेहेळ वैजीचे सरपंच संदीप जाबरे, उपसरपंच रुपेश शेलार, भोमचे सरपंच मिलिंद शिर्के, शिरळ शाखा प्रमुख हेमंत मोरे, राजू मोरे यांनी आमदार भास्कर जाधव यांना निवेदन दिले. त्यांनीही पुढील कार्यवाही पूर्ण होऊन शुक्रवारपासून बससेवा सुरू झाली. शुक्रवारी आगारातून सुटलेल्या पहिल्या फेरीचे वैजी येथे सुकाई, चंडीकाई देवस्थान ट्रस्टचे विश्वस्त के. एस. मोरे, नितिन निकम, पोलीस पाटील सतीश मोरे, संतोष कांबळे, निकिता कदम, अश्विनी मोहीते, संतोष मोरे, विजय पवार, भोम सरपंच श्रावणी मोहिते, पोलीस पाटील रुपेश कदम, प्रकाश पंदीरे, शिरळ येथे सरपंच शशिकांत राऊत, फैय्याज शिरळकर यांच्यासह ग्रामस्थांनी स्वागत करतानाच चालक, वाहकांचा सत्कार करण्यात आला.

## सिंधुरत्न टॅलेंट परीक्षेत जि.प. केंद्रशाळा तुळसवडे नं १ चा चि. ध्रुव प्रविण किंजळस्कर जिल्ह्यात दुसरा

**दैनिक युवक आधार**
**राजापूर - (प्रमोद तरळ)**
तालुक्यातील जि.प. पूर्ण प्राथमिक केंद्रशाळा, तुळसवडे नं. १ म्हणजे प्रत्येक उपक्रमात अग्रेसर असलेली शाळा, या शाळेने आपली गुणवत्तेची परंपरा कायम ठेवली असून सन २०२४-२५ या वर्षामध्ये घेण्यात आलेल्या सिंधुरत्न टॅलेंट परीक्षेत इयत्ता तिसरीचा विद्यार्थी चि. ध्रुव प्रविण किंजळस्कर याने जिल्हा गुणवत्ता यादीत दुसरा क्रमांक पटकावून यश संपादन केले आहे. त्यामुळे सर्वच स्तरातून कौतुकाचा वर्षाव केला जात आहे.

सिंधुरत्न टॅलेंट परीक्षेतील गुणवंतांचा नुकताच गुणगौरव कार्यक्रम स्वामी समर्थ मंगल कार्यालय, साळवी स्टॉप रत्नागिरी, येथे आयोजित केला होता. सदर कार्यक्रमात राजापूरचे लोकप्रिय आमदार मा. श्री. किरणजी सामंत यांच्या शुभ हस्ते चि. ध्रुव किंजळस्कर व पालकांचा रोख रक्कम व मेडल देवून सन्मान करण्यात आला,

चि. ध्रुवचे शाळेतील सर्व गुरुजन शाळेचे केंद्र मुख्याध्यापक श्री. प्रविण किंजळस्कर व त्यांना साथ देणारे त्यांचे सहकारी पदवीधर शिक्षक श्री. प्रसाद दरडे आणि उपशिक्षक श्री. सुग्रीव मुंडे या सर्वांनी व तुळसवडे केंद्राचे केंद्र प्रमुख श्री. प्रभाकर चव्हाण सर, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष व सदस्य या सर्वांनी कौतुक केले व ध्रुवला पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# लोकप्रिय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त रक्तदान शिबिरांमधून शुभेच्छा

### आ. प्रशांत ठाकूर व चिरंजीव अमोघ ठाकूर यांचेही रक्तदान

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी )**

दरवर्षी लोकप्रिय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आपला वाढदिवस साधेपणाने साजरा करत असले तरी कार्यकर्ते त्यांचा वाढदिवस विविध सामाजिक उपक्रमांच्या माध्यमातून साजरा करतात. यावर्षी भाजपा प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी केलेल्या आवाहनानुसार विक्रमी रक्तदान करून लाडक्या देवाभाऊंना शुभेच्छा देण्यात आल्या आहेत. त्याच अनुषंगाने पनवेलमध्ये विविध ठिकाणी रक्तदान शिबिरांचे आयोजन करण्यात आले. लोकप्रिय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशाला सन २०४७ पर्यंत विकसित राष्ट्र निर्माण करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. या राष्ट्रनिर्माणाच्या ऐतिहासिक प्रक्रियेत महाराष्ट्राचे अमूल्य योगदान असेल यात कोणतीही शंका नाही. लाडके मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हातात महाराष्ट्राचे नेतृत्व असल्यानेच हे शक्य होणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सर्वसमावेशक भूमिकेमुळेच राज्याचे ट्रिलियन डॉलर इकॉनोमीचे स्वप्न मूर्त स्वरूपात होणार आहे, देवेंद्र







फडणवीस कसलेले राजकारणी, तर आहेत त्याचबरोबर तितक्याच आत्मीयतेने जनतेच्या अथक सेवेसाठी प्रशासनावर जबरदस्त पकड असणारे, सुशासनाचा आदर्श घालून देणारे, जनतेला लोकाभिमुख सेवा देणारे कार्यक्षम आणि दूरदृष्टीकोन असलेले मुख्यमंत्री आहेत. त्यांच्या वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देताना अनेक सामाजिक उपक्रम राबवले जात आहेत. त्याच अनुषंगाने कार्यसम्राट व लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर व जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांच्या मार्गदर्शनाखाली पनवेल विधानसभा मतदार संघातील पनवेल, कामोठे, कळंबोली, आकुर्ली, खांदा कॉलनी, खारघर, ओवेपेठ, आदी विविध ठिकाणी रक्तदान शिबिरांचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमात स्वतः आमदार प्रशांत ठाकूर व त्यांचे चिरंजीव अमोघ ठाकूर यांनी पनवेल येथील मध्यवर्ती कार्यालयात रक्तदान करून समाजाप्रती आदर्श उदाहरण ठेवले. यावेळी भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष जयंत पगडे, माजी उपनगराध्यक्ष मदन कोळी व इतर पदाधिकाऱ्यांनीही रक्तदान केले. आमदार ठाकूर, ज्येष्ठ नेते व माजी नगराध्यक्ष जे. एम. म्हात्रे, भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांनी विविध ठिकाणी आयोजित रक्तदान शिबिरांना प्रत्यक्ष भेटी दिल्या व रक्तदात्यांना प्रेरणा व शुभेच्छा दिल्या. या उपक्रमात शेकडो रक्तदात्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून सामाजिक बांधिलकीची जाणीव दाखवून दिली. सर्व रक्तदात्यांना ब्लड डोनेट कार्ड आणि सन्मानपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. पनवेल येथील शिबिराचे उदघाटन आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी माजी उपमहापौर चारुशीला घरत, माजी शहर अध्यक्ष अनिल भगत, माजी नगरसेवक गणेश कडू, प्रभाकर बहिरा, सुनील बहिरा, भाजपच्या शहर अध्यक्षा रुचिता लोंढे, माजी नगरसेविका दर्शना भोईर, प्रिती जॉर्ज- म्हात्रे, सुरेखा मोहोकर, जॉनी जॉर्ज, सारिका भगत, सुरेश वास्कर, परमेश्वर गिरे, अमरीश मोकल, सतीश पाटील, अनेश ढवळे, राजेश भोईर, निलेश दराडे, रामा मोरबाळे, विनायक मुंबईकर यांच्यासह अनेक पदाधिकारी उपस्थित होते. पनवेल उत्तर मंडलाचे रक्तदान शिबीर रामशेठ ठाकूर महाविद्यालय पेठगाव येथे, खारघर शहर मंडल शिबीर रामशेठ ठाकूर स्कुल खारघर येथे, कामोठे शहर मंडल शिबीर आमदार प्रशांत ठाकूर जनसंपर्क कार्यालय कामोठे येथे, कळंबोली शहर मंडल शिबीर आमदार प्रशांत ठाकूर जनसंपर्क कार्यालय कामोठे येथे, पनवेल शहर मंडल शिबीर भाजप मध्यवर्ती कार्यालय पनवेल येथे, नवीन पनवेल मंडलाचे शिबीर रोटरी ब्लड बँक खांदा कॉलनी तर पनवेल पूर्व मंडलाचे शिबीर सेंट अँड्रयू स्कुल आकुर्ली येथे पार पडले.

महाराष्ट्र राज्य देशाच्या शाश्वत प्रगतीचा गतीचक्र आहे. आणि या गतीला दिशा देणारे नेतृत्व म्हणून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सारथ्य करत आहेत. अचूक निर्णय क्षमता त्यांच्याकडे आहे. त्यामुळे कार्यकर्ता म्हणून त्यांचा प्रवास 'राष्ट्रप्रथम' या तत्वाशी एकनिष्ठ राहून संकल्पपूर्ण नेतृत्वात झाला आहे. त्यांच्या प्रत्येक निर्णयात सामान्य माणूस केंद्रबिंदू राहिला आहे. त्यामुळे कर्तव्यकठोर मुख्यमंत्री सर्वांचे लाडके देवाभाऊ आहेत. ते आपला वाढदिवस साध्या पद्धतीने साजरा करत आले असले तरी वाढदिनी सामाजिक उपक्रमे मोठ्या स्वरूपात आयोजित करून शुभेच्छा दिल्या जातात त्याच अनुषंगाने पनवेलमध्ये रक्तदान शिबिरांचे आयोजन करण्यात आले. महाराष्ट्राला पुढे नेण्याचे काम करत आहेत त्यामुळे 'देवाभाऊ' सर्वांचे लाडके नेते आहेत, महाराष्ट्राच्या आणि देशाच्या विकासासाठी त्यांना निरोगी उदंड आयुष्य लाभो, या वाढदिवसानिमित्त शुभेच्छा! - आमदार प्रशांत ठाकूर

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस : विकासाच्या दूरदृष्टीसह सुशासनाचा आदर्श घालून देणारे व्यक्तीमत्व

**दैनिक युवक आधार**
**पनवेल प्रतिनिधी**

भारताचे लोकप्रिय प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी देशाला २०४७ पर्यंत विकसित राष्ट्र निर्माण करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. या राष्ट्रनिर्माणाच्या ऐतिहासिक प्रक्रियेत महाराष्ट्राचे अमूल्य योगदान असेल यात मला कोणतीही शंका नाही. लाडके मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हातात महाराष्ट्राचे नेतृत्व असल्यानेच हे शक्य होणार आहे. फडणवीस यांच्या सर्वसमावेशक भूमिकेमुळेच राज्याचे ट्रिलियन डॉलर इकॉनॉमीचे स्वप्न मूर्त स्वरूपात जनतेला पाहायला मिळणार आहे. त्यांच्या मंत्री मंडळात मंत्री म्हणून काम करण्याचा अनुभव म्हणजे विकासाची दूरदृष्टी आणि समाजकारणाचा ठेवा आहे असे मी मानतो. देवेंद्रजी कसलेले राजकारणी तर आहेतच त्याचबरोबर तितक्याच आत्मीयतेने जनतेच्या सेवेसाठी प्रशासनावर जबरदस्त पकड असणारे, सुशासनाचा आदर्श घालून देणारे, जनतेला लोकाभिमुख सेवा देणारे मुख्यमंत्री आहेत. कणखर बाण्याच्या या दृढनिश्चयी व्यक्तिमत्वाचा २२ जुलै रोजी जन्मदिन असून त्यांना माझ्या मनःपूर्वक लाख लाख शुभेच्छा! मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे एक व्हिजनरी नेतृत्व आहे. राज्यकारभारात अत्यत जटील प्रश्न मार्गी लावण्यात त्यांचा हातखंडा आहे. सरकारच्या शंभर दिवसांच्या कार्यकाळात विविध विभागाच्या कामगिरीचा आढावा त्यांनी घेतला. यात प्रशासकीय मूल्यमापन करण्याचा धाडसी निर्णयही त्यांनी घेतला. विभागांना जाहीररीत्या मूल्यांकन त्यांनी दिले. या निमित्ताने सरकारच्या कारभाराची जनतेत चर्चा होईल, याची जराही भीती फडणवीस यांनी बाळगली नाही. केवळ सकारात्मक परिणाम साधण्यासाठी तसेच तत्परतेने प्रशासकीय काम करण्यासाठी महाराष्ट्राच्या प्रशासकीय व्यवस्थेत त्यांनी हा नवा पायंडा त्यांनी घालून दिला. जनतेच्या हितासाठी धाडसी निर्णय घेणे हा फडणवीस यांच्या व्यक्तिमत्वाचा महत्वाचा पैलू यातून स्पष्ट होतो. माझ्या कौशल्य विकास, रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता या विभागावर त्यांनी विशेष लक्ष केंद्रित केले आहे. केवळ शहरी भागातच नाही. तर ग्रामीण तरुणांनाही स्टार्ट अप्सच्या माध्यमाने उज्जवल भविष्य देण्याचा त्यांचा मानस आहे. महाराष्ट्रभरातील स्टार्ट अप सुरु करू इच्छिणाऱ्या होतकरू तरुणांसाठी एकात्मिक सुविधा केंद्र सुरु केले जाणार आहे.देशात सर्वाधिक २८ हजार स्टार्टअप्स महाराष्ट्रात आहेत यामध्ये महिला स्टार्टअप्सची संख्याही देशात अग्रेसर आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर महिला स्टार्टअप्सला चालना देण्यासाठी ५२ महिलांना २ कोटी ३४ लाख रूपयांचे अर्थसहाय्य देण्यात आले आहे आणि त्यामध्ये वारंवार वाढच होत आहे. मुंबईतील चां दिवली अल्प संख्यांक शासकीय औद्योगिक शिक्षण प्रशिक्षण संस्था येथे नियोजित इमारतीचा आराखडा तयार करण्यात येत आहे. ही नियोजित वस्तू भारतातील एकमेव आणि अद्वितीय केंद्र म्हणून नावारूपाला येऊन महाराष्ट्रात स्टार्ट अप संस्कृती रुजवण्यास मदत होणार आहे. राज्यात २० आय.टी.आय मध्ये अत्याधुनिक प्रयोगशाळा उभारण्यात येणार आहेत. देशातील पहिली इनोव्हेटिव्ह सिटी महाराष्ट्रात उभारण्याचा निर्णय घेतला आहे. गिफ्ट सिटी च्या धरतीवर नवी मुंबई येथे ५०० कोटी खर्च करून २५० एकर मध्ये अत्याधुनिक हाय टेक सुविधायुक्त सिटी निर्माण करण्याचे नियोजन करण्यात येत आहे. यासाठी नाविन्यता विभाग युद्धपातळीवर कार्यरत असून मुख्यमंत्री फडणवीस यांचे मोलाचे सहकार्य यात लाभत आहे. सिंगापूर येथील आयटीई एज्युकेशन सर्व्हिसेस ( ITEES ) या संस्थेच्या सहकार्याने महाराष्ट्रात जागतिक कौशल्य विकास केंद्र स्थापन करण्याची योजना कौशल्य विभागाने आखली आहे. जागतिक दर्जाचा कौशल्य विकास साधत महाराष्ट्रातील



तरुणांना जागतिक रोजगाराच्या संधी या योजनेमुळे उपलब्ध होणार आहेत. यातही मुख्यमंत्री फडणवीस यांचे सहकार्य लाभत असून लवकरच अत्याधुनिक ट्रेड्स सह हे जागतिक कौशल्य विकास केंद्र उभे राहील,याची मी निसंकोचपणे ग्वाही देतो. कौशल्य विकास विभागाकडून महत्वकांक्षी मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना राबवण्यात येत असून सुरूअसलेल्या या योजनेत सद्य स्थितीत १ लाख ५० हजार विद्यार्थी कार्य प्रशिक्षण घेत आहेत. नुकताच कार्य प्रशिक्षणाचा कालावधी सहा महिन्यांवरून ११ महिन्यांचा करण्यात आला आहे. महाराष्ट्रातील १८ ते ३५ वयोगटातील युवकांना विविध महामंडळे, उद्योग आणि आस्थापनांमध्ये प्रत्यक्ष कामाचे प्रशिक्षण देण्यात येत आहे. बारावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांना दरमहा सहा हजार, आयटीआय किंवा पदविका प्राप्त विद्यार्थ्यांना आठ हजार तर पदवी / पदव्युत्तर प्राप्त प्रशिक्षणार्थींना १० हजार रुपये विद्यावेतन थेट त्यांच्या बँक खात्यात जमा केले जात आहे. कौशल्य विभागाच्या या महत्त्वपूर्ण योजनेत मुख्यमंत्र्यांचे अमूल्य योगदान आहे. आतापर्यंत या योजनेवर ४८१ कोटी इतके रूपये खर्च झाले आहेत. केवळ एका विभागापुरतेच नाही तर राज्यातल्या प्रत्येक विभागातल्या विविध योजनांमध्ये मुख्यमंत्री फडणवीस स्वतः लक्ष घालून योजना सुसूत्रपणे जनतेपर्यंत कशी पोहोचेल याची काळजी ते घेतात. कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता आयुक्तालयातंर्गत राबविण्यात येणाऱ्या सर्व योजनांतर्गत माहे डिसेंबर, 2024 ते मे, 2025 या कालावधीमध्ये विविध योजनांद्वारे एकूण 1,34,303 उमेदवारांना रोजगार प्राप्त झालेला आहे. कौशल्य विभागाच्या अंतर्गत राज्यात 203 रोजगार मेळावे संपन्न झालेले असून यामध्ये 2492 उदयोजकाद्वारे 1,20,572 रिक्तपदे अधिसूचित करण्यात आली. सदर रोजगार मेळाव्यात 63,441 उमेदवार सहभागी झाले . त्यापैकी 23,854 उमेद वारांची निवड करण्यात आलेली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनात या विभागाचे काम सुसूत्रपणे अविरत सुरु आहे. पंखांना बळ देण्याची त्यांची भूमिका राज्याला प्र ग तीच्या नव्या शिखरावर घेऊन जाईल यात मला तसूभर ही शंका नाही. मुख्यमंत्री फ ड णवीस केंद्रीय पातळीवर ही विविध योजनांचा पाठपुरावा क रू न कौशल्य विभागाला अ धि क सक्षम करत आहेत. यापैकीच एक योजना आहे 'मॉडेल करिअर सेंटर' ग्रामीण तसेच निमशहरी भागातील रो जगार इच्छुक उमेदवा रां ना रोजगाराच्या संधी, पार द र्शीरित्या व प्रभावी पध्दतीने तंत्रज्ञानाच्या सहायाने समुपदेशन आणि प्रशिक्षणाद्वारे उपलब्ध क रु न देण्याच्या उद्देशा ने केंद्र शासनामार्फत मॉडेल करिअर सेंटर ही योजना सुरु करण्यांत आलेली आहे. केंद्र शासनाच्या रोजगार व प्रशिक्षण महानिदेशालय तसेच श्रम व रोजगार मंत्रालयामार्फत " राष्ट्रीय करीयर सेवा" ( N A T I ONAL CAREER SERVICE) ही योजना मंजुर क र ण्यात आलेली आहे. डिसेंबर २०२४ ते जून २०२५ या कालावधीत 1,26,482 उ मे दवारांची नोंदणी झाली असू न 62,862 उमेदवारांचे समु प देशन करण्यात आले. प्रधानमंत्री श्री नरेंद्र मोदी यांनी देशाला २०४७ पर्यंत विकसित राष्ट्र करण्याचा संकल्प के ला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फड णवीस यांच्या नेतृत्वात महाराष्ट्रही कौशल्य विकासाच्या माध्यमाने या संकल्पात आपले योगदान देत आहे. विविध रोजगार मेळावे,मुख्यमंत्री युवा कार्यप्रशिक्षण योजना,प्रधानमंत्री कौशल्य विकास योजना,दिनदयाळ अंत्योदय योजना,आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्र तसेच आयटीआय,रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ,राज्य नाविन्यता सोसायटी,कौशल्य विकास आयुक्तालय यांच्यामार्फत यासह विविध रोजगाराच्या योजना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कालावधीत सुरू करण्यात आल्या . या योजनांमुळे युवकांमध्ये आत्मविश्वास निर्माण झाला असून हा फार मोठा सामाजिक बदल दिसून येत आहे. युवकांना त्यांच्या आवडीनुसार प्रशिक्षण मिळाल्यामुळे भविष्यात समाजासाठी आणि देशासाठी काहीतरी वेगळं करून दाखवण्याची उर्मी तरुणांमध्ये जागृत होत आहे. जागतिक दर्जाचे कौशल्य प्रशिक्षण तरुणांना देशातच नाही तर विदेशातही रोजगाराच्या संधी मिळवून देत असल्याचा आम्हाला सार्थ अभिमान आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे राज्यकारभार करण्यात जसे पारंगत आहेत. तसेच त्यांची पक्षावरही निष्ठा आहे. पक्षाची ध्येय धोरणं राबवण्यात ते मागे राहत नाहीत. मोठ्या पदावर असूनही आपल्यातला कार्यकर्ता त्यांनी जिवंत ठेवलाय. अ ने क दा राजकीय स्थित्यंतरे हा राजकारणाचा अविभाज्य भा ग असतो. अशाच एका स्थित्यंतरतुन ३० जून २०२२ मध्ये शिवसेनेचे एकनाथ शिं दें यांनी मुख्यमंत्री म्हणून आ णि देवेंद्र फडणवीस यांनी उप मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली. मुख्यमंत्री पदाचा सलग पाच वर्षाचा दीर्घ अनुभव, सर्वाधिक आमदारांचे पाठबळ आणि सक्षम नेतृत्वगुण अंगी असतानाही त्यांनी पक्षाचा आदेश पाळत, उपमुख्यमंत्री पदाची शपथ घेऊन पक्षाच्या अनुशासनाची प्रचिती साऱ्या जगाला करून दिली. व्यक्ती मोठी नाही तर पक्ष मोठा हा संस्कार त्यांनी आपल्या कृतीतून कार्यकर्त्यांवर केला,असे अनुशासित मुख्यमंत्री सर्वसमावेशक नेतृत्व महाराष्ट्राला लाभले आहे. महाराष्ट्राला प्रगतीपथावर नेणाऱ्या या कर्तृत्वान, दूरदृष्टीच्या नेत्याला आरोग्यदायी उदंड आयुष्य लाभो, ही त्यांच्या जन्मदिनी सदिच्छा व्यक्त करतो.

***मंगल प्रभात लोढा मंत्री कौशल्य,रोजगार,उद्योजकता व नाविन्यता,महाराष्ट्र राज्य***

# चिपळुणातील उड्डाणपूल कापसाळपर्यंत न्यावा

## शासनाकडे पाठपुरावा करण्याचा महायुतीच्या बैठकीत निर्णय; समिती स्थापन करणार

**दैनिक युवक आधार**
**चिपळूण (प्रतिनिधी)**:-- चिपळूण शहरातून जाणाऱ्या मुंबई-गोवा महामार्गावरील बहादूरशेख ते प्रांताधिकारी कार्यालयापर्यंत होणाऱ्या उड्डाण पुलाची लांबी कापसाळ शासकीय विश्रामगृहापर्यंत नेण्याच्या मागणीसाठी शनिवारी चिपळुणातील महायुतीच्या घटक पक्षांच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांच्या बैठकीत शासनाकडे पाठपुरावा करण्याचा निर्णय झाला. यावेळी उपस्थितांनी या पुलामुळे आणि महामार्गावरील चुकीच्या व निकृष्ट कामांमुळे शहरासहीत नागरिकांना मोठा फटका बसत असल्याने शासनाकडे पुलाच्या कामासंदर्भात आक्रमक भूमिका घेण्याचा निर्णय घेण्यात आला. शहरातून जाणाऱ्या मुंबई-गोवा महामार्गावर बहादूरशेख ते प्रांत कार्यालयापर्यंत उड्डाण पूल बांधण्यातआला आहे. मात्र हा पूल बहादूरशेख ते कापसाळ असा होणे गरजेचे होते. मात्र, प्रांत कार्यालयापर्यंत उड्डाण पूल बांधण्यात येत आहे. शहरातील नगारिकांना अनेक त्रासदायक घटनांना सामोरे जावे लागत आहे. महामार्गाच्या या उड्डाणपुलाचे डिझाईन देखील चुकीच्या पद्धतीने करण्यात आले आहे. उड्डाण पुलाचे काम एखाद्या भिंतीसारखे असल्याने शहराचे विभाजन होणार आहे. एका बाजूला डोंगर भागात नागरी वस्ती आहे, तेथून नागरी वस्तीसह येणारे पावसाचे पाणी या पुलाच्या चुकीच्या व निकृष्ट कामामुळे पाण्याचा योग्य दिशेने निचरा होत नाही. त्याचबरोबर महामार्गानजिकच रुग्णालय, महाविद्यालय, शाळा, शासकीय कार्यालये असल्याने या ठिकाणी नागरिक व विद्यार्थ्यांची गैरसोय होणार आहे. उड्डाण पुलासह वळण मार्ग, जोड मार्ग आदी वर्दळीच्या भागात गेल्या काही महिन्यांत अनेक अपघात झाले आहेत. त्यामध्ये काहींचा मृत्यू झाला तर काहीजण गंभीर जखमी आहेत. एकूणच महामार्गाचे काम आणि त्याचा दर्जा म्हणजे चिपळुणातील जनतेची फसवणूक करणारा असून चिपळूण शहरातून जाणारा महामार्ग हा मृत्यूचा सापळा झाला आहे.



एकूणच या सर्वाविरोधात व चिपळूण शहर भविष्यात सर्व दृष्टीने सुरक्षित राहावे, याकरिता महायुतीच्या बैठकीत उकुडाण पूल कापसाळपर्यंत नेण्यासाठी आक्रमक भूमिका निर्णय वेण्यात आला. त्यानुम्यार समिती स्थापन करण्यासहीत आमदार सेखर निकम यांच्या माध्यमातून पालकमंत्री उदय सामंत यांच्या सहकायनि केंद्रीय वाहतूकमंत्री नितीन गडकरी यांच्याकडे पाठपुरावा करण्याचा निर्णय झाला.

या बैठकीला राष्ट्रवादी काँग्रेसचे (अजित पवार गट) शहर अध्यक्ष मिलिंद कापडी, शिवसेना (शिंदे गट) शहरप्रमुख उमेश सकपाळ, भाजपा शहर अध्यक्ष शशिकांत मोदी तर महाराष्ट्र युवती उपाध्यक्ष दिशा दाभोळकर, शिवसेना (शिंदे गट) महिला जिल्हाध्यक्षा सौ. रश्मी गोखले, सोशल मोडिया जिल्हाध्यक्ष सचिन साडविलकर, युवा सेना अध्यक्ष निहार कोवळे, क्षेत्राध्यक्ष मनाली जाधव, शहराध्यक्ष शहराध्यक्षा प्राजका टकले, अदिती देशपांडे, माजी उपनगराध्यक्ष सुधीर शिंदे, माजी नगरसेवक विजय चितळे, मनोज जाधव, माजी नगरसेवक आदीसह घटक पक्षातील पदाधिकारी उपस्थित होते.

# पत्रकार दत्ता खंदारे यांची यशवंतराव चव्हाण पुरस्कारासाठी निवड!

**दैनिक युवक आधार**
**मुंबई वार्ताहर** :तीन दशकांहून अधिक काळ सामाजिक, विधायक कार्यात अग्रेसर राहणारे आणि लेखणीव्दारे वृत्तपत्रांतून समाजातील व्यथा, वेदना, समस्या आजही सातत्याने मांडत रहाणारे जेष्ठ वृतपत्र लेखक, पत्रकार,साप्ताहिक भगवे वादळचे संपादक दत्ता खंदारे यांना सा.आम्ही मुंबईकरचा सांस्कृतिक व साहित्यरत्न तर यशवंतराव चव्हाण फाऊंडेशनचा यशवंतराव चव्हाण पुरस्कारासाठी नुकतीच निवड करण्यात आली आहे.



पत्रकार दत्ता खंदारे यांनी गेल्या ३०वर्षांच्या कालावधीत विविध दैनिक, साप्ताहिक आणि मासिका मध्ये सामाजिक प्रश्न मांडून त्या सोडविण्याचा प्रयत्न केला. तसेच प्रसिद्ध झालेली कात्रणे संबंधित खात्याकडे पाठवून संबंधित समस्या सोडवण्यासाठी शासनदरबारी पाठपुरावा केला. आजपर्यंत पत्रकार दत्ता खंदारे यांना पन्नासहून अधिक पुरस्कार मिळाले असून यात डॉ. बाबासाहेब आंबेडकर गौरव पुरस्कार (इंदौर), राष्ट्रीय एकात्मता फेलोशिप, साहित्य रत्न लोकसेवा पुरस्कार, महाराष्ट्र समाजभूषण पुरस्कार, महाराष्ट्र गुणगौरव पुरस्कार, महाराष्ट्र संपादक भूषण आणि मुंबई वृत्तपत्र लेखक संघटनेचा जागृत नागरिक आणि पत्रभूषण पुरस्कार, हिंदुस्थान 'बुक ऑफ रेकॉर्ड' पुरस्कार आणि नुकतेच त्यांना कार्यदर्पण पुरस्कारने ही गौरवण्यात होते.दिल्ली येथील महाराष्ट्र सदनात भारतरत्न डॉ. बी. आर.आंबेडकर राष्ट्रीय सर्वोत्कृष्ट पत्रकार पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. . पत्रकार दत्ता खंदारे यांना भारतीय दलित साहित्य अकादमी (दिल्ली)चा डॉ.आंबेडकर राष्ट्रीय फेलोशिप हि प्राप्त झाला असून पुन्हा एकदा सा.आम्ही मुंबईकरचा सांस्कृतिक व साहित्यरत्न तर यशवंतराव चव्हाण फाऊंडेशनचा यशवंतराव चव्हाण पुरस्कारासाठी दत्ता खंदारे यांची निवड झाल्याने समाजात विविध स्थरातून त्यांच्यावर अभिनंदनासह कौतुकाचा वर्षाव होत आहे.

# माजी उपनगराध्यक्ष कुलदीपक शेंडे यांचा शिवसेना शिंदे गटात पक्ष प्रवेश

## मंत्री भरत शेठ गोगावले व खासदार श्रीरंग आप्पा बारणे यांच्या उपस्थितीत भव्य दिव्य पक्षप्रवेश

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी वार्ताहर**
खोपोली च्या सर्वांगीण विकासासाठी सदैव कटिबद्ध असणारे जेष्ठ समाजसेवक माजी नगराध्यक्ष रामदास शेंडे त्यांच्या लोकसेवेचा वारसा पुढे चालवणारे अभ्यासू युवा नेतृत्व माजी उपनगराध्यक्ष कुलदिपक शेंडे यांनी विविध क्षेत्रात आपल्या योगदानातुंन शहरात नवनवीन उपक्रम अभियानातून नागरी सुविधा देण्यात महत्व पूर्ण कार्य केले .खोपोलिकारांशी जुडलेली त्यांची नाळ त्यांनीं सदैव विविध कार्यक्रम संवाद, भेटीतून टिकवली.राजकीय क्षेत्रातील त्यांच्यावर विश्वास ठेवणारा वर्ग त्यांच्या आजात शत्रू व्यक्तीमत्वा मुळे कधी त्यांचा विरोधी ठरला नाही .सर्वांना सोबत घेऊन चालण्याची त्यांची मानसिकता त्यांना शहरातील संवेदनशील लोकनेतृत्व म्हणून ओळख देणारी ठरली.राज्यात माजी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली शिवसेना शिंदे गटाच्या प्रभावी नेतृत्वात कार्यसम्राट आमदार म्हणून महेंद्र शेठ थोरवे यांच्या कार्य कुशल पद्धतीवर ते नेहमी आकर्षित होते. अभ्यासू नियोजनात मतदार संघाच्या विकासासाठी सदैव निर्भीड पणे लढणारा लोकनेतृत्व म्हणून त्यांनी आमदार महेंद्र थोरवे यांच्या मार्गदर्शनाखाली विविध स्तरावर कार्य केले.असे असताना खोपोली शहरातील विकास जलद गतीने





व्हावं यासाठी त्यांची तळमळ पाहता त्यांनी दि.२०जुलै रोजी राज्याचे मंत्री भरत गोगावले, खासदार श्रीरंग बारणे व कर्जत खलापूर मतदार संघाच्या जनतेच्या मनावर अधिराज्य गाजवणारे कार्यसम्राट आमदार महेंद्र थोरवे यांच्या प्रमुख उपस्थितीत श्री.समर्थ मंगल कार्यालयाच्या सभागृहात शिवसेनेच्या खोपोली शहरातील मेळाव्यात कुलदीपक शेंडे,दिलीप जाधव,संदीप पाटील,राजू घोसाळकर व अन्य शेकडो कार्यकर्त्यांच्या समावेत शिवसेनेत पक्ष प्रवेश केला.आगामी खो.न.प.च्या निवडणूका पाहता पालिकेवर भगवा फडकविण्यासाठी थोरवे यांच्या नेतृत्वाखाली शिवसैनिक तयार असल्याचे चित्र यावेळेस स्पष्टपणे दिसत होते. खासदार बारणे यांनी आमदार महेंद्र थोरवे यांच्या कार्याचे कौतुक स्वतः पक्षप्रमुख माजी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे करतात असे सांगत स्वातंत्र्यानंतरच्या कालावधीत सर्वाधिक विकास कामे कर्जत खालापूर विधानसभा मतदारसंघात महेंद्र थोरवे यांच्या नेतृत्वाखाली झाली असल्याचे सांगितले तर भाई शिंदे यांनी कर्जत खालापूर मतदार संघात पंचवीस वर्षे इतिहास घडवणारे शिवसैनिक यापुढेही स्थानिक स्वराज्य संस्थेच्या प्रत्येक निवडणुकीत भगवा फडकवतील असा विश्वास व्यक्त केला. मंत्री भरत शेठ गोगावले यांनी तुमच्यासाठी सरकार व विरोधकांच्या सोबत लढणारा आमदार म्हणून महेंद्र शेठ थोरवे मतदार संघाच्या सर्वांगीण विकासासाठी अहोरात्र प्रयत्न करत असतो त्याच्या पाठीशी आपण सदैव उभे राहून त्यांना विजय मिळवून दिल्याबद्दल शिवसेनेच्या वतीने आपले आभार व्यक्त करतो असे सांगितले. माजी उपनगराध्यक्ष म्हणून काम पाहिलेले कुलदिपक शेंडे यांच्या कडे त्यांचे वडिल माजी नगराध्यक्ष रामदास शेंडे यांचा अनुभव नक्कीच खोपोली शहराच्या विकासाच्या गतीला चालना देणारा असेल या प्रवेशा मुळे शिवसेना पक्ष संघटना अधिक सक्षम होईल असा विश्वास ही व्यक्त करत पक्ष प्रवेश घेणाऱ्या सर्वांचे अभिनंदन केले. आमदार महेंद्र थोरवे यांनी आगामी निवडणुकीच्या दृष्टिकोनातून शिवसेना पक्ष संघटना मजबूत करण्यासाठी मोठ्या ताकतीने मेळाव्यात पक्षश्रेष्ठींच्या मार्गदर्शनातून नवचैतन्य घेऊन कामाला लागा शिवसेनेचा भगवा हा होणाऱ्या निवडणुकीत फडकवायला तयार व्हा असे सांगत पक्षप्रवेश घेणाऱ्या सर्व मान्यवरांचे आभार व अभिनंदन केले.

**दैनिक युवक आधार** हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक भारती संतोष आमले.

**daily YUVAK ADHAR** Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST- RAIGAD, Editor Bharti Santosh Amle


# जळगांव जिल्ह्यातील भालोद येथील महाविद्यालयातील प्रा. डॉ.सुनील नेवे याचे शोधनिबंधाचे वाचन.

## सेऊल दक्षिण कोरिया येथे आंतरराष्ट्रीय राज्यशास्त्र परिषदे मध्ये

**दैनिक युवक आधार**
**किशोर रमाकांत गुडेकर, मुंबई विभाग प्रतिनिधी प्रमुख प्रतिनिधी** - आंतरराष्ट्रीय राज्यशास्त्र परिषदेच्या वतीने सेऊल दक्षिण कोरिया येथे दिनांक 12 जुलै ते 16 जुलै 2025 या दरम्यान आयोजित करण्यात आलेल्या पाच दिवसीय जागतिक परिषदे मधे सेकंडरी एज्युकेशन सोसायटी संचलित कला व विज्ञान महाविद्यालय भालोद येथील राज्यशास्त्र विभाग प्रमुख प्रा.डॉ.सुनील नेवे यांनी "दक्षिण आशियातील राजकीय ध्रुवीकरण सध्याच्या परिस्थितीत भारत पाकिस्तान आणि बांगलादेश चे तुलनात्मक विश्लेषण" या विषयावर शोधनिबंधाचे वाचन केले. यावेळी या पॅनलचे समन्वयक डॉ. जोस व्हेरीसीमो रोमाव नेट्टो (सावू पोलो विद्यापीठ ब्राझील दक्षिण अमेरिका) डॉ. बेंजामिन गोल्डफ्रॅंक (सेटऑन हॉल विद्यापीठ उत्तर अमेरिका), डॉ.कारला डी पैवा बेझेरा (इन्स्टिट्यूट ऑफ अप्लाइड इकॉनॉमिक रिसर्च ब्राझील साऊथ अमेरिका) प्रो. गिसले क्रावेरो (ब्राझील दक्षिण अमेरिका)या होत्या. यावेळी डॉ. श्रीमती कारला यांनी प्रा. डॉ सुनील नेवे यांच्या शोधनिबंधावर आपले मत व्यक्त करताना त्या म्हणाल्या की,विषयाची निवड योग्य होती,तसेच मुद्देसूद शोधनिबंध चे वाचन केले,राजकीय ध्रुवीकरण कसे कमी करता येईल याविषयी मांडलेली प्रा.नेवे यांची मते समाजाला दिशादर्शक ठरतील असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.आणि प्रा.नेवे यांचे कौतुक केले.या शोधनिबंधातून प्रा.नेवे यांनी काढलेले निष्कर्ष पुढील प्रमाणे आहेत...

दक्षिण आशियातील राजकीय ध्रुवीकरण ही एक गुंतागुंतीची समस्या आहे, जी शासन, लोकशाही आणि प्रादेशिक स्थिरतेसाठी महत्त्वपूर्ण आव्हाने निर्माण करते. राजकीय ध्रुवीकरण हे पक्षपाती माध्यमे,सोशल मीडियावरील नकारार्थी आणि खोट्या बातम्या,बदलते अस्थिर राजकारण आणि आर्थिक विषमता यामुळे वाढते आणि त्यामुळे सरकार चालवणे कठीण होत जाते लोकशाही मूल्यांचा ऱ्हास होत जातो लोकशाही वरील विश्वास कमी होत जातो सामान्य लोक निरोगी चर्चा करणे थांबवतात. 1947 मध्ये ब्रिटिश राजवटी पासून स्वातंत्र्य मिळाल्यापासून भारत राजकीय ध्रुवीकरणाच्या समस्येचा सामना करत आहे भारताचा सहभाग आणि विशेषतः हिंदू आणि मुस्लिमांमध्ये धार्मिक आधारावर पाकिस्तानची झालेली निर्मिती, भाषा ,प्रादेशिकता आणि जात यासारखे मुद्दे देखील भारतीय समाजात संघर्ष आणि विभाजनाचे स्त्रोत म्हणून उदयाला आले जे वारसाने राजकीय ध्रुवीकरणाकडे नेणारे आहेत. 1980 आणि 1990 च्या दशकात भाजपचा उदय आणि त्यांचा हिंदू राष्ट्रवादी अजेंडा भारतातील राजकीय ध्रुवीकरणाच्या इतिहासात एक महत्त्वाचा टप्पा ठरला.हिंदू अभिमान आणि अस्मितेवर भर देणाऱ्या भाजपाच्या राजकारणाच्या ब्रँडमुळे पक्षाला राष्ट्रीय पातळीवर निवडणुकीत यश मिळाले. भारतात फाळणी,जातीय विभाजन आणि प्रादेशिकता यांसारख्या ऐतिहासिक कारणांमुळे दीर्घकालीन तणाव निर्माण झाला आहे. भारतात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अल्पसंख्याकांसाठी सौगात हे मोदी नावाची मोहीम सुरू केली. या योजनेचा सुमारे 32 लाख मुस्लिम बांधवांना फायदा झाला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मुस्लिम बंधू आणि भगिनींना आवाहन केले की,





मुस्लिम समुदायाच्या एका हातात कुराण आणि दुसऱ्या हातात लॅपटॉप असावा अशी माझी इच्छा आहे. तिहेरी तलाक हा इस्लाम मध्ये प्रचलित घटस्फोटाचा एक प्रकार आहे ज्यामध्ये मुस्लिम पुरुष तीन वेळा तलाक उच्चारून आपल्या पत्नीला कायदेशीर रित्या घटस्फोट देऊ शकतो.30 जुलै 2019 रोजी भारतीय संसदेने तिहेरी तलाकची प्रथा बेकायदेशीर आणि असंवैधानिक घोषित केली आणि 1 ऑगस्ट 2019 पासून ती दंडनीय कृती म्हणून घोषित केले. हिंदू आणि मुस्लिमांमधील ध्रुवीकरण कमी करण्यासाठी आणि मुस्लिमांची मते पक्षाकडे आकर्षित करण्यासाठी भाजप सरकारने हाती घेतलेल्या उपाययोजनांपैकी हा एक भाग आहे. भारत सरकारने धर्मनिरपेक्ष तत्व स्वीकारलेले आहे आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे भारतीय संविधान हे जगात सर्वोच्च आहे. म्हणून भारतातील ध्रुवीकरण हे पूर्णपणे राजकीय आहे,सामाजिक नाही. पाकिस्तान मध्ये सुन्नी विरुद्ध शिया असा तणाव आणि धार्मिक अतिरेकीपणा हे प्रमुख मुद्दे ध्रुवीकरणाकडे नेणारे आहेत. त्यामुळे पाकिस्तानात राजकीय अस्थिरता, भ्रष्टाचार, मंद आर्थिक वाढ ,कमकुवत प्रशासन आढळून येते. बांगलादेशमध्ये स्वातंत्र्यानंतर खूप राजकीय हिंसाचार आणि लष्करी राजवट होती. त्यामुळे आर्थिक असमानता या देशांमध्ये निर्माण झाली. राजकीय अस्थिरता, लोकशाही नियमांचे उल्लंघन, भ्रष्टाचार आणि मानवी हक्काच्या समस्या त्यामुळे निर्माण झाल्या. राजकीय ध्रुवीकरणाला तोंड देण्यासाठी संवाद, संस्थात्मक सुधारणा, लोकशाही संस्था मजबूत करणे आणि प्रादेशिक सहकार्य यांचा समावेश असलेला बहुआयामी दृष्टिकोन आवश्यक आहे. अल्पसंख्याकांच्या हक्कांचे रक्षण करणे, सामाजिक आणि आर्थिक असमानता दूर करणे, शांतता, सुरक्षा आणि विकासाला चालना देण्यासाठी प्रादेशिक सहकार्य करणे आवश्यक आहे.यासाठी खुला संवाद,मजबूत लोकशाही व्यवस्था सामाजिक आणि आर्थिक न्याय आणि प्रादेशिक सहकार्य आवश्यक आहे. सध्या, भारत, पाकिस्तान आणि बांगलादेश या तिन्ही देशांच्या समस्या जवळजवळ सारख्याच आहेत, परंतु सामान्य किमान कार्यक्रमाप्रमाणेच, तिन्ही देशांनी या दीर्घकालीन समस्येवर योग्य तोडगा काढण्यासाठी आणि एकमेकांना मदत करण्यासाठी धोरण स्वीकारले पाहिजे. या वेळी या शोधनिबंधाच्या माध्यमातून जगातून आलेल्या सर्व प्रतिनिधींना प्रा.डॉ.सुनील नेवे यांनी आवाहन केले की,
चला जगासमोर एक नवीन आदर्श ठेवूया, जसे की एकमेका सहाय्य करू अवघे धरू सुपंथ म्हणजे आपण एकमेकांना सहकार्य करूया आणि
विकासाचा न्याय्य मार्ग साध्य करूया आणि राष्ट्र, धर्म, पंथ, लिंग, भाषा, वंश या पलीकडे जाऊन वैश्विक मानवतेसाठी एकत्र काम करूया आणि जागतिक कल्याणाचे ध्येय साध्य करूया..प्रा.डॉ. सुनील नेवे यांचे आमदार अमोल हरिभाऊ जावळे अँटी करप्शन फाउंडेशन ऑफ इंडिया मानव अधिकार आंतरराष्ट्रीय फेडरेशन सर्व शक्ती सेना महाराष्ट्र राज्य अध्यक्ष प्रा. संजय मोरे अण्णा सर्व शक्ती सेना राज्य उपाध्यक्ष मायाताई मोरे मानव अधिकार जळगांव जिल्हाध्यक्ष प्रल्हाद भाऊ बोंडे सर्व शक्ती सेना जळगांव जिल्हाध्यक्ष मयुर कोळी सेकंडरी एज्युकेशन सोसायटी भालोद चे अध्यक्ष श्री.चंद्रकांत जगन्नाथ चौधरी, चेअरमन श्री लीलाधर विश्वनाथ चौधरी,व्हाइस चेअरमन श्री. मोहन वासुदेव चौधरी, उपाध्यक्ष श्री अनिल सुधाकर चौधरी सचिव श्री नितीन वासुदेव चौधरी यांचेसह संस्थेचे सर्व सन्माननीय पदाधिकारी व संचालक,महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. किशोर कोल्हे, सर्व शिक्षक,शिक्षकेतर कर्मचारी वर्ग आणि विद्यार्थी विद्यार्थिनी यांच्याकडून अभिनंदन करण्यात येत आहे.

## वाशी रोवळा मुंबई एसटी बसचा अपघात होता होता थोडक्यात वाचले प्रवाशी.

**दैनिक युवक आधार**
**तळा प्रतिनिधी नितीन लोखंडे.**



तळा : रविवारी सकाळी पाच वाजता सुटलेली वाशी रोवळा मुंबई एसटी बस क्रमांक MH 14, MH0198 ही एसटी बस चालक सकाळी वाशी वरून मुंबईकडे घेऊन जात असताना मुंबई गोवा महामार्गावर कोलाड ते नागोठणे च्या आसपास एसटी आली असता अचानक एसटीचे समोरील दोन्ही टायर फुटले. चालकाने प्रसंगावधान राखून एसटी बसचा आणि एसटीमध्ये असलेल्या प्रवाशांचा जीव वाचवला. काळ आला होता पण वेळ आली नव्हती म्हणून सुखरूप वाचले प्रवासी. रोहा आगाराची साधी बस रोज रात्री मुंबईहून साडेदहा वाजता मुंबई रोवळामार्गे वाशीला येते. तिच एसटी सकाळी पाच वाजता वाशी वरून रोवळा तळा मार्गे मुंबईकडे जात असते. या मार्गावरून मुंबईकडे जाणारी आणि येणारी ही एकमेव एसटी बस आहे. या बसला सुरू होऊन 50 पेक्षा अधिक वर्ष झालेली आहेत. या मार्गावरील बसला प्रवाशांचा चांगला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. एसटी महामंडळाला या बस पासून चांगला नफा मिळत आहे. पण रोहा आगर प्रशासनाने अशा टायर झिजलेल्या तांत्रिक बिघाड असलेल्या बस या मार्गावर पाठवू नयेत. प्रवाशांच्या जीवाशी खेळू नये एसटी बसची तपासणी करूनच बस या मार्गावर सोडावी. अन्यथा अपघात झाल्यास रोहा एसटी आगार प्रशासनाला जबाबदार धरण्यात येईल.

## प्रा. संजय मोरे यांची आमदार विक्रांत पाटील यांच्यासोबत जळगाव विषयी केली चर्चा

**दैनिक युवक आधार**
**किशोर रमाकांत गुडेकर, मुंबई विभाग प्रतिनिधी प्रमुख**

मुंबई - भाजपा कार्यालय मुंबई येथे भाजपा महामंत्री आमदार विक्रांत पाटील यांच्या सोबत भाजपा अनु.जाती मोर्चा राज्य सचिव प्रा.संजय मोरे यांनी आगामी महानगर पालिका नगरपालिका जिल्हापरिषद पंचायत समिती निवडणुकी बाबत सविस्तर चर्चा ...

अँटी करप्शन मानव अधिकार सर्व शक्ती सेना राज्य तथा भाजपा अनुजाती मोर्चा राज्य सचिव अध्यक्ष प्रा.संजय मोरे यांनी जळगांव जिल्ह्यातील आगामी महानगरपालीका नगरपालीका जिल्हा परिषद पंचायत समिती या बाबत सविस्तर चर्चा केली.त्यावेळी आमदार विक्रांत पाटील यांनी जळगांव जिल्ह्यातील आगामी निवडणूकी बाबत सविस्तर चर्चा करून संपुर्ण माहिती जाणुन घेऊन जळगांव जिल्ह्यात भाजपा पक्षाचे जास्तीजास्त उमेदवार कसे निवडून येतील या बाबत मार्गदर्शन केले.त्या वेळी प्रा.संजय मोरे यांनी त्यांना आश्वासन दिले की, आगामी निवडणुकी मध्ये निवडणुकी मध्ये भाजपा अनु. जाती मोर्चाचा सिंहाचा वाटा राहील .जळगाव जिल्ह्यात जास्तीजास्त उमेदवार निवडून आणण्यासाठी गिरीष भाऊ महाजन जलसंपदा मंत्री संजय सावकारे वस्त्रोद्योग मंत्री आमदार अमोल हरिभाऊ जावळे आमदार राजु मामा भोळे आमदार मंगेश चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली अहोरात्र परिश्रम घेऊन जास्तीजास्त उमेदवार




निवडून आणण्यासाठी अहोरात्र परिश्रम घेऊ असे आश्वासन आमदार विक्रांत पाटील यांना प्रा. संजय मोरे यांनी दिले. त्या
प्रसंगी त्याच्या सोबत अँटी करप्शन राज्यउपाध्यक्ष प्रशांत जाधव सर्व शक्ती सेना राज्य उपाध्यक्ष मायाताई मोरे सर्व शक्ती सेना जिल्हाध्यक्ष मयुर कोळी डॉ.नंदकुमार वरणकर डॉ.संदीप गाढे मानव अधिकार जिल्हाध्यक्ष सचिन सुरवाडे प्रा.अनिल सपकाळे शेखर देशमुख प्रा. स्नेहा सोनवणे प्रा. योगिता सपकाळे शोभा सपकाळे या सह अनेक पदाधिकारी उपस्थित होते.

## अखिल महाराष्ट्र कुणबी सेवा संघ शाखा वांद्रे,खार, सांताक्रूझ आयोजित गुणगौरव व वह्या वाटप कार्यक्रम संपन्न



**दैनिक युवक आधार**
**मुंबईः- (प्रमोद तरळ)**
अखिल महाराष्ट्र कुणबी सेवा संघ शाखा वांद्रे खार सांताक्रुझ तर्फे रविवार दि. १३/०७/२०२५ रोजी सायंकाळी ४:०० वाजता, सूर्योदय हॉल, गावदेवी वाकोला,सांताक्रूझ पूर्व मुंबई -४०००५५. या ठिकाणी प्रतिवर्षाप्रमाणे याहीवर्षी विदयार्थी गुणगौरव समारंभ व विद्यार्थ्यांना वह्या वाटप कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

या कार्यक्रमाला समाजनेते श्री.रवींद्र मटकर, संघसचिव श्री.संतोष जोगले, संघसहसचिव श्री. तुलसीदास नवाले यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच शाखेचे पदाधिकारी,कार्यकारणी सदस्य व समाज भगिनी व समाज बांधव तसेच पालकवर्ग व विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते.

शाखेचे अध्यक्ष श्री.नामदेव परवडी, उपाध्यक्ष श्री.रमेश खांडेकर,खजिनदार श्री. दिलीप शिवगण, सहसचिव श्री. मंगेश मळेकर, महिला अध्यक्षा सौ.सुनीताताई चांदिवडे, महिला सचिव सौ.स्नेहा बावकरताई, संघांच्या माजी अध्यक्षा सौ. लिलावतीताई कातकर,विभागप्रमुख श्री.नारायण मिरजोळकर, तसेच शाखेचे कार्यकारिणी सदस्य श्री. कानू पळसमकर, धावडेमामा,कातकर मामा,महिला कार्यकारिणी सौ.सुरेखाताई चव्हाण, सौ.मयुरी रावण, सौ. प्रणाली तांबे सौ.भक्ती देवधरे उपस्थित होते. सूत्रसंचालन श्री. विवेक साळवी यांनी केले.

सर्व मान्यवरांचे सभागृहाला उत्तम मार्गदर्शन लाभले. अध्यक्षीय भाषणात शाखेचा कामकाजासंबंधी माहिती देण्यात आली. अशा रीतीने उत्तमरीतीने हा सोहळा पार पडला.

# तळणी कृषी मंडळात ढगफुटी सदृश्य पाऊस; शेती जमीन साहित्यासह उभ्या पिकांचे मोठे नुकसान

### तळणी सर्कलमध्ये सर्वाधिक १४७.८ मी. मी. पावसाची नोंद

शेतकरी हतबल; पिक विमा नसल्याने भरपाई मिळणार का, यावर प्रश्नचिन्ह

दैनिक युवक आधार
उपसंपादक महाराष्ट्र राज्यः- राजु शिंदे.
: मंठा तालुक्यातील तळणी कृषी मंडळात सोमवारी मध्यरात्रीनंतर तब्बल तीन तास विजेच्या कडकडाटासह ढगफुटी सदृश्य मुसळधार पावसाने जोरदार तडाखा दिला. या अतिवृष्टीमुळे नदी, ओढ्यांच्या काठच्या अनेक शेतजमिनी खरडून गेल्या असून, शेतीसाठी वापरण्यात येणारे शेती साहित्य तसेच खरिपातील कपाशी, सोयाबीन, तूरसह फळबागा आणि भाजीपाल्याचे पीके वाहून गेले आहेत.
या भागातील अनेक शेतजमिनीना तलाव स्वरूपात बदलल्या असून, वडगाव




सरहद्द, शिरपूर, वाघाळा, हनवतखेडा, देवठाणा, कानडी , उस्वद , दूधा,किर्ला आदी गावांमध्ये या पावसाचा विशेष फटका बसला आहे.
पावसामुळे ओढ्यांना अचानक पूर आल्याने जवळील शेती, घरे व मालमत्तेचे मोठे नुकसान झाले. काही ठिकाणी जुन्या घरांची पडझड झाली असून मातीच्या व पत्र्याच्या घरांचे छप्पर कोसळले आहे. पाण्यामुळे अनेक घरातील संसारोपयोगी साहित्याचे नुकसान झाले असून, वाहनांनाही पुराच्या पाण्यात अडकून पडावे लागले. पावसाच्या धास्तीने अनेकांनी संपूर्ण रात्र जागून काढली. नुकसानीचे व्हिडिओ व फोटो जिल्हाधिकाऱ्यांना पाठविण्यात आले पावसाच्या तडाख्याचे दृश्य दाखवणारे फोटो व व्हिडिओ आ. बबनराव लोणीकर यांच्या माध्यमातून जिल्हाधिकाऱ्यांकडे पाठविण्यात आले असल्याची माहिती भाजपाचे तालुका उपाध्यक्ष शरद पाटील व युवा मोर्चाचे जिल्हा उपाध्यक्ष नितीन सरकटे , वाघाळा सरपंच सुनिल कांगणे यांनी दिली.
तळणी कृषी मंडळाचे अधिकारी व्ही.आर. खोबरे यांनीही पावसामुळे ओढ्याजवळील शेतजमीनीसह पिकें वाहून गेल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. अचूक माहिती पावसाचे पाणी ओसरल्यानंतर मिळेल, असे सांगितले. पिक विमा न भरल्याने शेतकरी संकटातया पावसाने खरीप हंगामातील पिके अक्षरशः उध्वस्त केली आहेत. मात्र, यंदा अनेक शेतकऱ्यांनी पिक विमा भरलेला नाही, ही बाब चिंतेची आहे. विमा न घेतल्याने नुकसान भरपाई मिळेल की नाही, हा प्रश्न शेतकऱ्यांसमोर उभा ठाकला आहे.
"नुकसान मोठं आहे, पण पिक विमा भरलेला नाही. अशा स्थितीत शासन मदत करणार का?" असा सवाल शेतकरी नानासाहेब खंदारे यांनी उपस्थित केला आहे.
या संपूर्ण घटनेमुळे शेतकरी वर्गामध्ये प्रचंड निराशा आहे. शासनाने याची गंभीर दखल घेऊन तात्काळ पंचनामे करून आर्थिक मदत जाहीर करावी, अशी उबाठाचे तालुका संघटक ज्ञानेश्वर माऊली सरकटे यांनी केली आहे.

## इनरव्हील क्लबचा पदग्रहण सोहळा संपन्न ; शुभांगी पिंपळकर क्लबच्या नूतन अध्यक्षा

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी)**
दरवर्षी एक जुलै नंतर इनरव्हील क्लबचे नवीन वर्ष सुरू होते आणि नवीन प्रेसिडेंटचा पदग्रहण सोहळा पार पडतो. याला अनुसरून सन २०२५-२६ या वर्षासाठी शुभांगी शिरीष पिंपळकर यांची इनरव्हील क्लब ऑफ पनवेलच्या अध्यक्षा म्हणून तसेच डॉक्टर सौ अमृता सुमुख नाईक यांची सचिव म्हणून सर्वानुमते निवड झाली. त्यानुसार त्यांचा पदग्रहण सोहळा दिमाखात पार पडला. या सोहळ्यासाठी प्रमुख पाहुण्या म्हणून इनरव्हील डिस्ट्रिक्ट ३१३ च्या डिस्ट्रिक्ट चेअरमन पनवेलच्या प्रसिद्ध गायनाकॉलॉजीस्ट डॉक्टर शोभना शैलेश पालेकर उपस्थित होत्या.

कार्यक्रमाचा शुभारंभ दीप प्रज्वलन तसेच इनरव्हील प्रार्थनेने झाला. यानंतर माजी अध्यक्ष डॉक्टर विणा निखिल मनोहर यांनी गतवर्षी केलेल्या कामाचा आढावा घेतला. आणि नूतन अध्यक्षा शुभांगी पिंपळकर यांच्याकडे पदभार सोपविला.

यावर्षी खजिनदार म्हणून अवंतिका मारूलकर, आय एस ओ शिल्पा चंदने, एडिटर म्हणून वर्षा ठाकूर तसेच सीपीसी म्हणून सुलभा निंबाळकर यांची नेमणूक झाली आहे. या प्रसंगी करुणेश्वर वृद्धाश्रमाला धान्य वाटपाचा प्रोजेक्ट करण्यात




आला.हा प्रोजेक्ट क्लब च्या सिंधुताई सपकाळ या ग्रूप ने स्पॉन्सर केला होता, कार्यक्रमाच्या शेवटी व्हाईस प्रेसिडेंट संयोगिता बापट यांनी उपस्थितांचे आभार मानले. कार्यक्रमाची सांगता माजी व्हॉइस प्रेसिडेंट वंदना लघाटे यांनी गायलेल्या पसायदानाने झाली.

# गडचिरोलीची 'स्टील हब'च्या स्वप्नपूर्तीकडे वाटचाल

## नैसर्गिक संपत्तीचा विनाश न करता विकास साधण्यास प्राधान्यक्रम

## गडचिरोलीला राज्यातील पहिल्या क्रमांकाचा जिल्हा बनविणार- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## गडचिरोलीत लॉयड्स मेटल्सच्या विविध प्रकल्पांचे उद्घाटन व भूमिपुजन

**दैनिक युवक आधार**
**सुरेश कडू विदर्भ आवृत्ती संपादक** : गडचिरोलीची 'स्टील हब'च्या दिशेने वाटचाल होत असून सर्वसामान्य नागरिकांच्या जीवनात लोह उद्योग प्रकल्पातून मोठ्या प्रमाणात रोजगार उपलब्ध होत आहे. त्यातून त्यांचे जीवनमानात उत्पन्नात वाढ होऊन गडचिरोली राज्यातील पहिल्या क्रमांकाचा जिल्हा होईल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज येथे व्यक्त केला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते गडचिरोली जिल्ह्यातील कोनसरी येथे लॉयड्स मेटल्स अण्ड बदल घडून गडचिरोलीत परिवर्तन घडत आहे. जल, जंगल, जमीन या गडचिरोलीच्या नैसर्गिक संपत्तीचा विनाश न करता विकास साधण्यास प्राधान्यक्रम असणार आहे. पुढील काही वर्षात नागरिकांच्या दरडोई एनर्जी लिमिटेडच्या (एलएमईएल) विविध प्रकल्पांचे उद्घाटन आणि भूमिपूजन करण्यात आले. यात हेडरी येथील ५ दशलक्ष टन प्रतिवर्ष क्षमतेच्या आयर्न ओर ग्राइंडिंग प्लांट, हेडरी ते कोनसरी दरम्यानची ८५ किलोमीटर लांबीची आणि १० दशलक्ष टन प्रतिवर्ष क्षमतेची स्लरी पाइपलाइन, आणि कोनसरी येथील ४ दशलक्ष टन प्रतिवर्ष क्षमतेच्या पेलेट प्रकल्पाचे उद्घाटन करण्यात आले. याव्यतिरिक्त, कोनसरी येथे ४.५ दशलक्ष टन प्रतिवर्ष क्षमतेचा एकात्मिक स्टील प्रकल्प, १०० खाटांचे रुग्णालय, सीबीएसई शाळा आणि सोमनपल्ली येथील लॉयड्सच्या कर्मचारी वसाहत या प्रकल्पांचे भूमिपूजनही मुख्यमंत्र्यांच्या हस्ते आज करण्यात आले. गडचिरोलीला 'स्टील हब ऑफ इंडिया' बनविण्याच्या दिशेने हे एक महत्त्वाचे पाऊल असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी सांगितले. राज्याचे वित्त व नियोजन, कृषी, मदत व पुनर्वसन, विधी व न्याय, कामगार राज्यमंत्री तसेच गडचिरोली जिल्ह्याचे सहपालकमंत्री अड. आशिष जयस्वाल, पद्मश्री पुरस्कार प्राप्त सामाजिक कार्यकर्त्या तुलसी मुंडा, आमदार धर्मरावबाबा आत्राम, आमदार डॉ. मिलिंद नरोटे, विशेष पोलिस महानिरीक्षक संदीप पाटील, पोलिस जिल्हाधिकारी अविश्यंत पंडा, उपमहानिरीक्षक अंकित गोयल, जिल्हा पोलिस अधीक्षक श्री. निलोत्पल, लॉयड्स मेटल्सचे व्यवस्थापकीय संचालक बी. प्रभाकरन, गोंडवाना विद्यापीठाचे कुलगुरू प्रशांत बोकारे, कोनसरीचे सरपंच श्रीकांत पावडे यांच्यासह अनेक मान्यवर यावेळी उपस्थित होते.



**गडचिरोली: विकासाच्या नव्या पर्वाकडे**
मुख्यमंत्री फडणवीस यांनी आपल्या भाषणात गडचिरोलीच्या विकासावर आणि 'स्टील हब' बनविण्याच्या स्वप्नपूर्तीवर विशेष भर दिला. ते म्हणाले की, गडचिरोलीचा चेहरामोहरा बदलविण्याचे काम लॉयड्सच्या माध्यमातून होत आहे. २०१६ पासून अनेक अडचणींवर मात करून येथे लोह उत्खनन सुरू झाले आहे. गडचिरोलीत लोह उत्खननासाठी परवानगी देताना, जिल्ह्याचा वसाहतीसारखा वापर होऊ नये आणि येथेच रोजगार निर्माण होऊन स्टील प्रकल्पही सुरू व्हावा, या अटींवरच परवानगी देण्यात आली होती. आतापर्यंत १४ हजार स्थानिकांना रोजगार मिळाला आहे, ज्याचे उत्तम उदाहरण म्हणजे कंपनीत हाऊसकीपिंग ते एलएनजी ट्रॅक्स चालकांपर्यंतच्या पदांवर काम करणाऱ्या महिलांचा प्रवास असल्याचे मुख्यमंत्री यावेळी म्हणाले.

**पर्यावरणपूरक विकास आणि 'ग्रीन गडचिरोली' संकल्पना**
८० किलोमीटर लांबीची स्लरी पाइपलाइन ही प्रदूषण टाळण्यास मदत करेल, ज्यामुळे कार्बन उत्सर्जनात सुमारे ५५ टक्के घट होईल. राज्यातील पहिली आणि देशातील चौथी अशी ही स्लरी पाइपलाइन असल्याचं त्यांनी नमूद केलं. भविष्यात ई-वाहनांचा वापर आणि गॅसवर चालणाऱ्या वाहनांद्वारे 'ग्रीन ट्रान्सपोर्टेशन'वर भर देऊन प्रदूषणमुक्त विकासाची ग्वाही त्यांनी दिली. पुढील दोन वर्षांत एक कोटी झाडे लावून गडचिरोलीचे वनआच्छादन वाढवण्याचे उद्दिष्टही त्यांनी सांगितले.

**स्थानिकांना आरोग्य आणि शिक्षणाची हमी**
उत्तम शिक्षण आणि आरोग्याच्या सुविधा स्थानिक स्तरावर उपलब्ध होतील. प्रत्येक नागरिकाला पाच लाखांपर्यंतचा उपचार शासन मोफत देत आहे, ज्यामुळे गडचिरोलीच्या नागरिकांना उपचारासाठी इतरत्र जाण्याची गरज भासणार नाही, असे त्यांनी सांगितले.

**माओवादमुक्त गडचिरोली आणि विकास प्रक्रियेत सहभागाचे आवाहन**
माओवादग्रस्त जिल्ह्याची ओळख पुसली जात असल्याचे सांगत उर्वरित माओवाद्यांनी शस्त्रे खाली ठेवून मुख्य प्रवाहात येत 'शहरी माओवादा'पासून सावध राहण्याचे आवाहन त्यांनी केले. गडचिरोलीचा विकास सुरू झाला असताना आदिवासींच्या जमिनी हिसकावल्या, 'मोठ्या प्रमाणात जंगलतोड झाल्याच्या अफवा पसरविण्यात आल्या. अशा अफवांपासून सावध राहा, कारण त्या लोकांना विकासापासून दूर ठेवण्यासाठी पसरवल्या जातात असे त्यांनी स्पष्ट केले. सहपालकमंत्री अड. आशिष जयस्वाल यांनी मुख्यमंत्र्यांच्या गडचिरोलीवरील आत्मीयतेचे कौतुक केले. आपल्या वाढदिवसाच्या दिवशी हजारो लोकांना भेटण्याची उत्सुकता असतानाही मुख्यमंत्री गडचिरोलीत उपस्थित राहिले हे या जिल्ह्याप्रती असलेल्या त्यांच्या आपुलकीचे प्रतीक असल्याचे ते म्हणाले. पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या 'विकसित भारत' आणि मुख्यमंत्र्यांच्या नेतृत्वाखाली 'विकसित महाराष्ट्र' संकल्पनेचा त्यांनी उल्लेख केला. विकासाच्या या प्रवाहात सर्वांनी सहभागी व्हावे, असे आवाहनही त्यांनी केले. लॉयड्स मेटल्सचे व्यवस्थापकीय संचालक बी. प्रभाकरन यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक करून प्रकल्पातून करण्यात येणाऱ्या विविध विकास कामांची माहिती दिली. या कार्यक्रमाला माजी खासदार अशोक नेते, माजी आमदार डॉ. देवराव होळी, कृष्णा गजबे, रमेश बारसागडे, प्रशांत वाघरे आदी मान्यवर उपस्थित होते.

## हुमनी अळीचे व्यवस्थापन करावे. सहाय्यक कृषी अधिकारी शाम बाहेकर यांचे आवाहन

**दैनिक युवक आधार**
**उमेश साखरकर दिग्रस तालुका प्रतिनिधी**
पिकांच्या मुळाशी राहुन मुळाना खाणारी हुमणी अळी सध्या सोयाबीन, कापूस, हळद या पिकात हुमणी किडीचे प्रादुर्भाव कमी जास्त प्रमाणात आढळून येत असून शेतकऱ्यांनी या किडीचे व्यवस्थापन करावे.

हुमणी अळीचा व्यवस्थापन करण्यासाठी पिकांमध्ये शक्य असेल तोपर्यंत आंतरमशागत करावी, आंतर मशागत करताना शेतातील अळ्या हाताने वेचून नष्ट कराव्या. शक्य असल्यास मोकळया पद्धतीने पाणी द्यावे,

शेतातील तणांचा बंदोबस्त करावा, मेटेरायझीम अनिसोप्ली या जैविक बुरशीची ५० मिली प्रती १० लीटर पाण्यात मिसळून पंपाचे नोझल काढून प्रादुर्भावग्रस्त पिकांच्या मुळाशी आळवणी करावी, उभ्या पिकात एका सरळ रेषेमध्ये झाडांची मर होत असल्यास आणि अशा झाडांची मुळे हुमणी किडीने खाल्लेले असल्यास अशा ठिकाणी क्लोरोपायरीफॉस २० टक्के प्रवाही ५० मिली प्रति १० लीटर पाण्यात मिसळून पंपाचे नोझल काढून पिकाच्या मुळाशी आळवणी करावी. मिश्र कीटकनाशक मिसळून आळणी करावी, हुमणी कीड ही बहुभक्षी कीड असून या किडीमुळे झाडांची पाने पिवळे पडून झाडे सुकतात. अशी झाडे आढळल्यास झाड उपटून मुळे कुर्तडलेली आहेत. का ते पहावे तसेच मुळे कुर्तडलेल्या झाडाखाली दोन ते तीन इंच खोल मातीत हुमणी किडीच्या अळ्या आहेत. का ते शोधावे अळ्या दिसल्यास व लक्षणीय प्रादुर्भाव असल्यास नियंत्रणासाठी कीटकनाशकाचा वापर करावा, असे आवाहन सहाय्यक कृषी अधिकारी शाम बाहेकर यांनी केले आहे.



## खार पुर्व पाईप लाईन रोडवर अतिक्रमणाचे साम्राज्य

**दैनिक युवक आधार**
**मुंबई प्रतिनिधी:**
**प्रविणभाऊ पवार**
खार (पुर्व) जवाहर नगर, तीन बंगला चौकी ते हुसेन टेकडी परिसर म्हणजे पुर्वीचा पाइपलाइन रोड (आता संत ज्ञानेश्वर मार्ग) या मार्गा शेजारी असलेले वस्ती अनामिका मित्र मंडळ, धोबीघाट, वाघवाडी, राठोड वाडी, श्रीराम निवास, भवानी बॅक ते हुसेन टेकडी परिसरा पर्यंत सध्या या जागेवर जास्त प्रमाणात अतिक्रमण वाढलेले आहेत. तीन बंगला येथून पाईप लाईन मार्गावर जाण्यासाठी आत शिरल्यावर जेव्हा चालण्यासाठी सुरुवात करतात तेव्हा आपल्या निदर्शनास येईल की, सर्व प्रथम अनधिकृत चिकन सेंटर, मच्छीमार, भाजीपाला, पाणीपुरी गाडी विक्रेते, त्याच बरोबर अनधिकृत रिक्षा, टू व फोरविलर टेम्पो गाड्यांच्या दोन्ही बाजूंनी पार्किंग, राठोड वाडी हनुमान मंदिर समोर चक्क अनधिकृत भंगार विक्रेत्यांनी सर्व परिसर व्यापून टाकला आहे. त्याच बरोबर मैदानी खेळण्यासाठी व नमाज पडण्यासाठी राखीव कंपाऊंड करुन ठेवलेली जागा. काही अनधिकृत स्टॉल, अनधिकृत गॅरेज या सर्वांनी सदर जागा आपल्या मालकीची समजून पसारा करुन थांड मांडून ठेवला आहे.



त्याचबरोबर येथील कचऱ्याचे डब्बे हद्दीच्या बाहेर आले आहेत. तसेच राबिटांचा साचलेला डोंगराचा ढिगारा, बेवारीस रिक्षा याने हा परिसर कित्येक वर्षे व्यापून टाकला आहे. सदर ४० फुटांचा रस्ता २० फुटाचा कधी झाला कळेलच नाही. या रोडवर अनेक वेळा रुग्णवाहिका व अग्निशमन दलाच्या गाड्यांना पण वेळ प्रसंगी व्यवस्थित जाता येत नाही. स्थानिक लोक प्रतिनिधी, सामाजिक कार्यकर्ते व रहिवासी सतत येणे जाणे चालू आहे. पण याविषयी कोणीही ब्रह्म पण काढत नाही. मुकाट्याने सर्व त्रास सहन करत आहेत. या मार्गावर चालने म्हणजे काट्यावरची कसरत करावी लागते. कोणीही स्थानिक लोकप्रतिनिधी लक्ष देत नाही.

तेव्हा एच पुर्व विभाग महानगरपालिका सांताक्रूझ संबंधित अधिकाऱ्यांनी आपले लक्ष केंद्रित करुन या मार्गावरील अतिक्रमण हटवून वरील मार्ग पुरर्वापार मोकळा करावा असे स्थानिक जनतेचे म्हणनं आहे.

## किरण कनगुटकर यांनी ५७ व्या वर्षी केले ६३ वेळा रक्तदान*

### ( मा.खासदार गोपाळ शेट्टी यांनी केला सत्कार )

**दैनिक युवक आधार**
**मुंबई प्रतिनिधी: प्रविणभाऊ पवार**
भारतीय जनता पार्टी बोरीवली विधानसभा बोरीवली पश्चिम मंडल यांच्या वतीने लोकमान्य बाळ गंगाधर टिळक जयंती निमित्ताने रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी माझी खासदार गोपाळ शेट्टी हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते.

या शिबिरामध्ये भाजपचे जेष्ठ पदाधिकारी किरण कनगुटकर यांनी वयाच्या ५७ व्या वर्षी ६३ वेळा रक्तदान करण्याचा विक्रम केल्याबद्दल खासदार गोपाळ शेट्टी यांच्या हस्ते विशेष सत्कार करण्यात आला. सत्कार प्रसंगी गोपाळ शेट्टी म्हणाले की, गोराई येथील अष्टविनायक मित्र मंडळाद्वारे गेली अनेक वर्षे रक्तदान शिबीर, आरोग्य शिबीराचे आयोजन करत असतात. बाळकृष्ण नायर, महेश राऊत सह अनेक पदाधिकारी असे अनेक प्रयत्न करुन एक चांगले वातावरण तयार करत असतात. आपण काम करत असताना काही लोक ही तळमळीने संस्थेला मदत करतात. हे पाहायचे असेल तर आज जे रक्तदान करत आहेत ते किरण कनगुटकर यांनी आतापर्यंत ६३ वेळा रक्तदान केले आहे. आणि त्याच्या प्रत्येक रक्तदान शिबीर मी उपस्थित असतो असे ते आवर्जून सांगतात. म्हणजे कार्यकर्ता हा किती लक्षात ठेऊन आपले काम करत आहेत हिच आपली कमाई आहे. आज मी परमेश्वराना प्रार्थना करतो की, या मंडळाला चांगली बुध्दी देवो.




## संत सावता महाराज यांच्या संजीवन समाधी सोहळया निमित्त चंदनझिरा प्रभागात येथील हनुमान मंदिर येथे अखंड हरिनाम सप्ताहास श्री नवनाथ वाघमारे यांनी दिली भेट

**दैनिक युवक आधार**
**संतोष रासावे जालना शहर**
सोमवार दिनांक 21 जुलै 2025 रोजी भेट देत ह.भ.प.सुनिल महाराज गवारे यांच्या कीर्तनाचे श्रवण करीत उपस्थितीनां संबोधित करून या सोहळयाला शुभेच्छा दिल्या.यावेळी समवेत ऍड.अशोकराव खरात,दिपक डोके,सुनील गोरे, विठ्ठलभाऊ दैने, संतोष रासवे रामेश्वर गाडेकर संतोष काळे शाम खरात बाबासाहेब मोठे,साडुं दैने,रावसाहेब मंडळकर,तुकाराम डोके,ऍड.दिनेश दैनै,योगेश दैने,दिनेश राऊत,सचिन दैने,,गणेश खरात,ज्ञानेश्वर सोनावणे,सतिष राऊत,कार्तिक मोठे,अजय पवार यांच्यासह महिला मंडळ गावकरी मंडळी व प्रतिष्ठित नागरिकांची व मान्यवरांची उपस्थिती होती



## "वास्तवात आरोग्य केंद्राची इमारतीची मोठी समस्या असताना देखील नाविन्यपूर्ण उपक्रमांमध्ये प्राथमिक आरोग्य केंद्राची सतत झेप"




**दैनिक युवक आधार**
**पिलीव प्रतिनिधी रघुनाथ देवकर** :-माळशिरस तालुक्यातील जि. प. सोलापूर पं स .माळशिरस अंतर्गत असलेल्या प्राथमिक आरोग्य केंद्र पिलीवच्या बाबतीत अनेक दिवसापासून नादुरुस्त इमारतीची वास्तवता असून देखील तेथील वैद्यकीय अधिकारी , डॉ. विलास जाधव , डॉ. फुले यांनी व त्यांचे सर्व सहकारी स्टाफ, आरोग्यसेविका, आरोग्य सेवक ,नर्सेस, आशा या सर्वांच्या आणि ग्रामस्थांच्या सहकार्याने प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये सेवा देण्याच्या बाबतीत प्रामाणिकपणे नियमितता ठेवून सतत नाविन्यपूर्ण उपक्रमातून आपल्या प्राथमिक आरोग्य केंद्राला पुढे नेण्याचा प्रयत्न करीत प्राथमिक केंद्राच्या अंतर्गत असलेल्या गावातील रुग्णांना सेवेबाबत कसलीही अडचण येऊ न देता कामकाज अविरतपणे चालु ठेऊन ग्रामस्थ व रुग्णांच्या मनात चांगले स्थान निर्माण केले आहे. शिवाय आषाढी,कार्तीकी वारीत सेवा देणे, तसेच प्राथमिक आरोग्य केंद्राच्या कक्षेत कोणत्याही अपघाती प्रसंगी स्टाफ व आवश्यकता भासल्यास अम्बुलन्स सहित तत्पर सेवा देण्याचे काम प्राथमिक आरोग्य केंद्र पिलीव मार्फत करण्याचा नेहमीच प्रयत्न केलेला आहे. चालू परिस्थितीमध्ये सुद्धा या धकाधकीच्या जीवनामध्ये आणि "दानात दान रक्तदान हे श्रेष्ठ दान आहे" हे ओळखून त्यांनी प्राथमिक आरोग्य केंद्र व ग्राम पंचायत पिलीव यांच्या विद्यमाने ग्रामस्थांच्या सहकार्याने रक्तदान शिबिर, आरोग्य तपासणी, कावीळ लसीकरण असे उपक्रम पिलीव ग्रामपंचायतचे प्रशासक मा. मिसाळ, ग्रामविकास अधिकारी एस एच भंडलकर , पत्रकार बांधव यांचे समवेत पंढरपूर ब्लड बँक यांचे माध्यमातून अतिशय चांगल्या पद्धतीने पार पाडले. रक्तदानाबरोबरच आरोग्य तपासणी व कावीळ लसीकरणाला सुद्धा प्रचंड प्रतिसाद मिळाल्याचे दिसून आले. यावेळी उपस्थित मान्यवरांना शाल श्रीफळ देऊन त्यांचाही सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमाची सर्व स्तरातून वाहवा व कौतुक केले जात आहे. सदर कार्यक्रमाचे वेळी सुद्धा उपस्थितांनीही पिलीव प्राथमिक आरोग्य केंद्राच्या इमारतीबाबत पूर्णत्वाच्या अपेक्षा व्यक्त केल्या.सर्व उपस्थितांचे आभार व्यक्त करून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

यावेळी सेवानिवृत्त विस्तार अधिकारी अनिल सावळजकर ,पत्रकार संजय पाटील, दामोदर लोखंडे, रघुनाथ देवकर, प्रमोद भैस, शाहरुख मुलाणी, सुजित सातपुते उपस्थित होते.

## कृषी उत्पन्न बाजार समितीच्या विशेष तपासणी पथकाची समिती गटीत

**दैनिक युवक आधार**
**सतीश कडू विदर्भ आवृत्ती संपादक**
: नागपूर येथील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या संचालक मंडळाने केलेल्या गैरव्यवहार / भ्रष्टाचाराबाबत जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर यांच्या अध्यक्षतेखाली विशेष तपासणी पथकाची स्थापना करण्यात आली आहे. या पथकाचे सदस्य सचिव तथा विभागीय सहनिबंधक शरद जरे, सहकारी संस्था छत्रपती संभाजी नगर यांनी प्रसिध्दी पत्रकान्वये ही माहिती दिली. उपरोक्त प्रकणाबाबत गैरव्यवहार / तपासणी करण्याकरिता व कार्यवाहीबाबत शिफारशी करण्याबाबत महाराष्ट्र शासन, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग शासन निर्णय क. कृवास २०२५/प्र.क्र.२३३/११-स. दि. १८ जुलै २०२५ या शासन निर्णयानुसार जिल्हाधिकारी, नागपूर यांच्या अध्यक्षतेखाली या समिती स्थापनेचा निर्णय घोषित करण्यात आला आहे.

सदर शासन निर्णयानुसार विशेष तपासणी पथकामार्फत चौकशी प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे. कृषी उत्पन्न बाजार समिती, नागपूर येथील संचालक मंडळाने केलेल्या गैरव्यवहार/ भ्रष्टाचाराच्या चौकशीच्या अनुषंगाने बाजार घटकांना अथवा बाजार समितीशी संबंधित व्यक्तींना विशेष तपासणी पथकास समितीला माहिती सादर करता येईल.

संबंधितांनी आपले म्हणणे मा. जिल्हाधिकारी, नागपूर, जिल्हा पोलीस अधिक्षक, नागपूर ग्रामिण यांच्या कार्यालयात सादर करावे अथवा संपर्क साधावा. तसेच विशेष तपासणी पथक यांचे कार्यालय पत्ता भूविकास बँक कॉम्प्लेक्स, दुसरा माळा, गणेशपेठ पोलीस स्टेशनसमोर, नागपूर-१२ व EMAIL: APMCSIT25@GMAIL.COM या पत्यावर माहिती पाठवावी, असे आवाहन विभागीय सहनिबंधक शरद जरे यांनी केले आहे.

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करुन मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

# निफाड येथे गुरुवर्य वि.दा. व्यवहारे यांचा अभिष्टचिंतन सोहळा संपन्न

**दैनिक युवक आधार**
**नाशिक जिल्हा प्रतिनिधी**
**राहुल कुलकर्णी**

निफाड येथील सामाजिक ,अध्यात्म ,शैक्षणिक क्षेत्रातील सामाजिक कार्यकर्ते व न्या रानडे विद्या प्रसारक मंडळ संस्थेचे कार्यकारी विश्वस्त गुरुवर्य वि.दा. व्यवहारे सर यांचा सहस्त्रचंद्रदर्शन व अभिष्टचिंतन सोहळा निफाड येथील स्वरा बँक्वेट हॉल येथे संपन्न झाला या सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी त्र्यंबकेश्वर येथील अखिल भारतीय श्री स्वामी समर्थ गुरुपीठाचे चंद्रकांतदादा मोरे हे होते तर व्यासपीठावर प्रमुख अतिथी म्हणून आंतरराष्ट्रीय कीर्तीचे शास्त्रज्ञ प्रा. डॉ. ओमप्रकाश कुलकर्णी, आमदार दिलीप बनकर,निफाडचे उपविभागीय अधिकारी डॉ. शशिकांत मंगरुळे , माजी आमदार अनिल कदम ,माजी शिक्षक आमदार नानासाहेब बोरस्ते ,निफाडच्या नगराध्यक्ष शारदा कापसे ,उपनगराध्यक्ष अनिल कुंदे, न्या रानडे विद्या प्रसारक मंडळाचे सचिव रतन पाटील वडघुले आदी मान्यवर उपस्थित होते याप्रसंगी गुरुवर्य वि.दा.व्यवहारे सर लिखित मार्ग प्रकाशाचा या ग्रंथाचे प्रकाशन आंतरराष्ट्रीय कीर्तीचे शास्त्रज्ञ प्रा.डॉ.ओमप्रकाश कुलकर्णी यांच्या हस्ते संपन्न झाले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक रतन पाटील वडघुले यांनी केले याप्रसंगी चंद्रकांतदादा मोरे,प्रा. डॉ.ओमप्रकाश कुलकर्णी, आमदार दिलीप बनकर ,माजी आमदार अनिल कदम , अनिल कुंदे, प्रकाश दायमा, सुमन महाले, वेदिका व्यवहारे ,गौरी राऊत यांची भाषणे झाली सन्मानार्थी वि.दा व्यवहारे यांचे भाषण झाले यापसंगी वि.दा. व्यवहारे यांची ग्रंथतुला करण्यात



आली विशेष म्हणजे या कार्यक्रमाला आलेल्या असंख्य हितचिंतकांनी व्यवहारे सर यांना पुस्तके भेट देऊन एक नवीन आदर्श घालून दिला यापसंगी पंढरीनाथ थोरे, गुणवंत होळकर ,राजाभाऊ शेलार, नानासाहेब पाटील, शिवाजी ढेपले,शिवाजी निरगुडे,अर्जुन कोकाटे,किरण कापसे,राजेंद्र राठी, दिलीप वाघवकर,राजेश सोनी, मधुकर राऊत, विश्वास कराड, विक्रम रंधवे , अजिंक्य वाघ ,बि.ग .बोरस्ते ,गोकुळ बाविस्कर, जगन खापरे ,कैलास सोनवणे, हरिश्चंद्र भवर, मधुकर शेलार,संजय कुंदे, मुकुंद होळकर,संजय गाजरे, जयवंत खडताळे, कवी लक्ष्मण महाडिक ,डॉ किरण राठी, डॉ रुपेश वाघ, अशोक निकम, इंद्रभान रायते, मधुकर व्यवहारे, प्रवीण कराड,प्रवीण ठाकरे, कवी राजेंद्र सोमवंशी, सुनील भुतडा, खंडू बोडके,दिनेश बागमार, मधुकर माळी, सुभाष खाटेकर,तनवीर राजे,आदींसह नागरिक उपस्थित होते सूत्रसंचालन कवी विवेक उगलमुगले यांनी तर आभार प्रदर्शन सुभाष खाटेकर यांनी केले

फोटो– गुरुवर्य वि.दा. व्यवहारे यांच्या अभिष्टचिंतन सोहळयाप्रसंगी उपस्थित अखिल भारतीय श्री स्वामी समर्थ गुरुपीठाचे प्रमुख चंद्रकांतदादा मोरे ,आंतरराष्ट्रीय कीर्तीचे शास्त्रज्ञ प्रा. डॉ.ओमप्रकाश कुलकर्णी,आमदार दिलीप बनकर , निफाडचे उपविभागीय अधिकारी डॉ. शशिकांत मंगरुळे, माजी शिक्षक आमदार नानासाहेब बोरस्ते ,निफाडच्या नगराध्यक्ष शारदा कापसे , न्या रानडे विद्या प्रसारक मंडळाचे सचिव रतन पाटील वडघुले आदी

## पनवेल कळंबोली-रोडपाली परिसरातील किराणा दुकानाला रात्री भीषण आग; लाखो रुपयांचे नुकसान

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

पनवेल कळंबोली येथील रोडपाली परिसरात सोमवार 21 जुलै रात्री 11:30 च्या सुमारास पाटील डेअरी या किराणा मालाच्या दुकानाला भीषण आग लागल्याची घटना घडली. या आगीत संपूर्ण दुकान जळून खाक झाले आहे.



प्राथमिक माहितीनुसार, शॉर्टसर्किटमुळे ही आग लागल्याचा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. दुकान बंद झाल्यानंतर काही तासांतच आगीचे लोळ अचानक उसळले. येथे लागलेली आग परिसरातील नागरिकांच्या लक्षात आल्यावर त्यांनी तातडीने अग्निशमन विभागाला कळवले. घटनास्थळी पनवेल महापालिकेच्या अग्निशमन दलाच्या गाड्या दाखल झाल्या व आग आटोक्यात आणण्यात यश आले. या आगीत दुकानातील किराणा माल, डेअरी उत्पादने, स्टोरेज यंत्रणा आणि इतर साहित्य पूर्णतः जळून खाक झाले. या आगीत अंदाजे 10 ते 15 लाख रुपयांचे नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज वर्तवला जात आहे. सुदैवाने यात कोणतीही जीवितहानी झालेली नाही.

## शाळेतील मुलांनी घेतला शेतात भात लावणीचा अनुभव

**दैनिक युवक आधार-**
**श्रीवर्धन तालुका प्रतिनिधी**
**- अनिकेत मोहित**

आपला भारत देश हा शेतीप्रधान देश आहे पण सध्याच्या विकसनशील काळात शेती ही नामशेष होत चालली आहे, विकासाच्या नावाखाली शेती उजाड केली जात आहे, त्यातच वाढती महागाई, आर्थिक संकट आणि इतर रोजगाराच्या संधी उपलब्ध नसल्यामुळे खेड्यातील तरुण पिढी उदरनिर्वाहासाठी शहराकडे वळू लागली आहे, गावच्या गाव ओसाड होत जात आहेत, पण गालसुरे गावातील मराठी शाळेने मुलांना आतापासूनच शेतीची माहिती आणि आवड निर्माण व्हावी म्हणून भात शेती लावणीचा प्रात्यक्षिक उपक्रम राबवला, गालसुरे काठी गावातील शेतकरी श्री. रामकृष्ण मांजरेकर यांच्या शेतामध्ये भात लावणी वेळी मुलांना नेऊन मुलांना शेतीची माहिती दिली आणि प्रत्यक्षात भात शेती कशी करावी याच प्रात्यक्षिक करून दाखवलं, शेती वाचवा आणि शेतकरी वाचवा असा नारा देत मुलांनी पण या वेगळ्या अनुभवाचा मनमुराद आनंद घेतला



## धर्माबादेत मा. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त भव्य रक्तदान शिबिर संपन्न

### भारतीय जनता पार्टी धर्माबाद धर्माबाद च्या वतीने तसेच ॲड.चक्रेश पाटील यांच्या पुढाकारातून हा सामाजिक उपक्रम यशस्वी

**दैनिक युवक आधार**
**धर्माबाद प्रतिनिधी : गिरमाजी सुर्यकार**

महाराष्ट्र राज्याचे लोकप्रिय नेते मुख्यमंत्री मा. देवेंद्रजी फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त धर्माबाद शहरात एका सामाजिक आणि विधायक उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. बॅनरबाजी, फलकबाजी किंवा इतर खर्च टाळून "महा रक्तदान संकल्पना" या नावाने भव्य रक्तदान शिबिर घेण्यात आले.

"रक्तदान हेच श्रेष्ठ दान" या प्रेरणेने आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमात मोठ्या संख्येने नागरिकांनी सहभाग नोंदवून सामाजिक बांधिलकीचा संदेश दिला.

कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून डॉ. कमल किशोर काकांणी साहेब उपस्थित होते तसेच धर्माबाद पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक सदाशिवराव भडीकर साहेब, वर्णी नागभूषणसाहेब, रवींद्र पोरगंटीवार, रमेश गौड, राजू सुरकुटवार, संजय अण्णा पवार, विजय राठोड, भोजराज गोणारकर, सुमलता पटकोटवार, अशोक पुजरवाड, ॲड. विनायकराव पवार, साईनाथ शिरपुरे, सायरेड्डी रेड्डी, सतीश मोटकूल, शंकरअण्णा बोलमवार, अविनाश पिंगळे,अजिस पिंजारी व काशू उशलवार यांच्या उपस्थितीत श्री हनुमान मंदिर येथे भव्य आरती करण्यात आली.



कार्यक्रमा प्रसंगी बोलत असताना रक्तदान हा सर्वोत्तमदान असून, रक्ताचे सदैव गरज असते. अनेकदा आपत्कालीन वेळी रक्ताची उपलब्धता नसल्याने जीवहणीचा धोका निर्माण होतो. या पार्श्वभूमीवर लोकांना रक्तदानासाठी प्रोत्साहित करणे तसेच रक्त पिढ्यातील रक्त साठा वाढविणे हे या शिबिराचे मुख्य धोरण असल्याचे तालुकाअध्यक्ष चक्रेश पाटील यांनी सांगितले.

=============

गेल्या काही दिवसापूर्वी ॲड. चक्रेशजी पाटील यांची भारतीय जनता पार्टी पक्षाच्या धर्माबाद तालुका अध्यक्षपदी नेमणूक झाल्यापासून युवकांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले असून त्यांच्या मार्गदर्शना खाली प्रत्येक सामाजिक, शैक्षणिक व राजकीय कार्यक्रम यशस्वी होताना दिसत आहेत.

सदरील रक्तदान शिबिराचे रिबीन कापून भव्य असे उद्घाटन करण्यात आले.

त्याच प्रकारे या महा रक्तदान शिबिरात धर्माबाद शहरातील विविध स्तरातील नागरिकांनी, कार्यकर्त्यांनी व युवा वर्गाने मोठ्या संख्येने सहभाग घेऊन रक्तदानाचे महत्त्व अधोरेखित केले. आणि रक्तदान करणाऱ्या व्यक्तींना भारतीय जनता पक्षाच्या वतीने तसेच परमपूजनीय गोळवळकर गुरुजी या रक्तपेढीच्या वतीने प्रमाणपत्र देण्यात आले.

## श्री संत शिरोमणी सावता महाराज चरित्र पारायण वर्ष १३वे सन्मित्र कॉलनी परतुर येथे संपन्न

**दैनिक युवक आधार**
**कार्यकारी संपादक :प्रा जगन्नाथ रासवे**

श्री संत शिरोमणी सावता महाराज यांच्या संजीवन समाधी सोहळा (पुण्यतिथी )निमित्त श्री संत सावता चरित्र पारायण वर्ष १३वे आरंभ दिनांक १६जुलै २०२५ वार बुधवार रोजी दुपारी 1 वाजता ह.भ.प. बाबासाहेब आर्धड महाराज यांच्या अमृतवाणीतून भाविक भक्तांनी तन्मयतेनेआस्वाद घेतला चरित्र पारायण याची सांगता व महाप्रसाद



दि.२३जुलै २०२५ वार बुधवार रोजी संपन्न होत आहे. दुपारी १ ते ४ महा प्रसाद राहील. तरी पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी हेच निमंत्रण पत्रिका समजुन महाप्रसादाचा आस्वाद घ्यावा असे अवाहन परतुर तालुका सावता परिषद अध्यक्ष तथा कार्याध्यक्ष माहिती अधिकार पत्रकार संरक्षण पोलीस मित्र समिती तथा विमा प्रतिनिधी श्रीपरमेशराव ढवळे यांनी केले आहे.

ठिकाण – राहते घर सन्मित्र कॉलनी परतुर सिद्धिविनायक गणेश मंदिर च्या बाजूला

1)मुरलीधर किसनराव ढवळे
2)विलास मुरलीधर ढवळे
3) भागवत मुरलीधर ढवळे
3)परमेश्वर मुरलीधर ढवळे

( सावता परिषद परतुर तालुका अध्यक्ष तथा कार्याध्यक्ष माहिती अधिकार पत्रकार संरक्षण पोलीस मित्र समिती परतुर, विमा प्रतिनिधी )

यांचे राहते घर सन्मित्र कॉलनी परतुर

## श्रीसंत भगवानबाबा व श्रीसंत वामनभाऊ प्रतिष्ठान इंद्रप्रस्थ कॉलनी बीड येथे २५ जुलै पासुन रामायण आयोध्याकांड ग्रंथ सुरू

**दैनिक युवक आधार**

**पाटोदा (प्रतिनिधी)** – २५ जुलै–२०२५ शुक्रवार पासून रोज श्रीसंत भगवानबाबा व श्रीसंत वामनभाऊ प्रतिष्ठान(मंदिर) इंद्रप्रस्थ कॉलनी नगर रोड बालेपीर, बीड येथे प्रतिवर्षा प्रमाणे याही वर्षी भाऊ – बाबा प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ.राजेंद्र भाऊ सानप आयोजित राष्ट्रसंत गुरूवर्य.वै.श्रीसंत.भगवानबाबा यांच्या जयंती निमित्त वर्षं १८ वे निमित्त या वर्षी दि२५/०७/२०२५ शुक्रवार ते १३/०८/२०२५ बुधवार या कालावधीत भावार्थ रामायण आयोध्याकांड या ग्रंथाचे रोज रात्री ०८:०० ते १०:० या वेळेत कथाभाग (पोथी) सुरू होणार आहे. या कथेचे सुचक ह.भ.प.कचरू महाराज चव्हाण व ह.भ.प.मोहन महाराज खरमाटे व वाचक ह.भ.प.उतम महाराज दोडके, ह.भ.प.दत्तायत्र महाराज, बांगर सर हे राहतील. तरी या ग्रंथाचा कथेच्या श्रवणाचा लाभ परिसरातील सर्व भाविक–भक्तांनी घ्यावा असे आवाहन कार्यक्रमाचे आयोजक व श्रीसंत भाऊ – बाबा प्रतिष्ठान बीडचे अध्यक्ष डॉ.राजेंद्र भाऊ सानप व त्यांच्या सर्व सहकारी यांनी व परिसरातील भाविक भक्त यांनी केले आहे.

## बाल लैंगिक शोषणाला प्रतिबंध करण्यासाठी 'अर्पण' कडून प्रशिक्षण

### दिग्रस तालुक्यातील ३०० शिक्षकांचा सहभाग

**दैनिक युवक आधार.**
**किशोर कांबळे तालुका प्रतिनिधी**
**दिग्रस.**

**दिग्रस** : जिल्हा परिषद यवतमाळ आणि अर्पण संस्था, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हा परिषद शाळेत कार्यरत प्राथमिक शिक्षक, मुख्याध्यापक यांच्यासाठी ‘बाल लैंगिक शोषणास’ प्रतिबंध करणाऱ्या वैयक्तिक सुरक्षा शिक्षण प्रशिक्षणाचे आयोजन दिग्रस येथे करण्यात आले होते. १८ ते २२ जुलै २०२५ दरम्यान येथील बुटले महाविद्यालयाच्या मीनाक्षी देवी जयस्वाल सभागृहात तालुक्यातील



तीनशे शिक्षकांनी या प्रशिक्षणाचा लाभ घेतला. जिल्हा परिषद शाळांमधील विद्यार्थी आणि पालकांना शाळा आणि घर परिसरात सुरक्षित वातावरण निर्माण होण्यासाठी या प्रशिक्षणाचा फायदा होणार आहे.\

बालकांसाठी वैयक्तिक सुरक्षा शिक्षण प्रशिक्षण देणारी अर्पण ही संस्था जागतिक स्तरावर मान्यताप्राप्त संस्था आहे. भारतातील बाल लैंगिक शोषणाच्या निर्मूलना करीता संस्थेला अनेक पुरस्कार मिळाले आहेत. अर्पण ही भारतातील सर्वात मोठी अशासकीय संस्था आहे जी लहान मुलांसहित प्रौढांसाठी सुद्धा बाल लैंगिक शोषण प्रतिबंध आणि हस्तक्षेप प्रशिक्षण सेवा प्रदान करते. २००७ पासून, अर्पणने तब्बल २० लाख मुलांना व प्रौढांना प्रशिक्षित केले आहे. । प्रशिक्षण कार्यक्रमात बाल लैंगिक शोषण या मुद्द्याची शिक्षकांना ओळख, मूल आणि मुलांचे अधिकार, बाल शोषण आणि बाल लैंगिक शोषणाचे प्रकार, समस्येविषयी आकडेवारी, बाल लैंगिक शोषणाचा अल्पकालीन आणि दीर्घकालीन प्रभाव, पोक्सो कायदा आणि तरतूदी, बालकांचे लैंगिक शोषण टाळण्यासाठी प्रतिबंधात्मक कार्यक्रम यावर चर्चा करण्यात आली. गट चर्चा व सादरीकरणाच्या माध्यमातून शिक्षकांना प्रशिक्षण देण्यात आले. साधनव्यक्ती म्हणून अर्पण संस्थेचे तज्ञ प्रशिक्षक सुशिल मोहिते आणि शांतीलाल रीकीबे यांनी काम पाहिले. तर गटशिक्षणाधिकारी मुकेश कोंडावार, विषय साधनव्यक्ती भारती बगडे, जयश्री सुधाकर ढोले यांचे सहकार्य प्रशिक्षण आयोजनात मिळाले.

## आधुनिक भारताचे शिल्पकार लोकमान्य टिळक जयंती

**दैनिक युवक आधार**
**सिल्लोड प्रतिनिधी :- योगेश पालोदकर**

– भारतीय राष्ट्रीय चळवळीचे जनक आणि प्रखर देशभक्त लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांचे नाव कोणाला माहीत नाही असं होणारच नाही. लोकमान्य टिळक हे एक महान स्वातंत्र्यसेनानी, उत्कृष्ट वक्ते, उत्तम समाजसुधारक, आदर्शवादी असा जहालमतवादी राष्ट्रीय नेता होते तसेच हिंदू धर्म, खगोलशास्त्र, संस्कृत आणि गणित या विषयांचे गाढे अभ्यासक म्हणूनही ते प्रसिद्ध होते. तसेच त्यांच्यात्यांच्या सामाजिक व राजकीय विचारामुळे त्यांना आधुनिक भारताचे शिल्पकार म्हणून ओळखले जाते. म्हणूनच लोकांनी मान्य केलेले लोकमान्य टिळक असा त्यांचा उल्लेख आजही केला जातो. अशा या प्रखर राष्ट्रभक्त लोकमान्य टिळक यांची जयंती २३ जुलै रोजी आपण साजरी करत आहोत.

लोकमान्य टिळक यांचे पूर्ण नाव बाळ गंगाधर टिळक होय, त्यांच्या वडिलांचे नाव गंगाधर तर आईचे पार्वतीबाई होते. लोकमान्य टिळक यांचा जन्म रत्नागिरी जिल्ह्यातील चिखली गावात २३ जुलै १८५६ साली झाला. टिळकांचे वडील एका शाळेत शिक्षक म्हणून काम करत होते. केवळ १६ व्या वर्षी टिळक वडिलांच्या मायेला पोरके झाले. वडिलांच्या निधनानंतर टिळकांचे संपूर्ण कुटुंब हे पुण्यात स्थायिक झाले व टिळकांनी तिथेच आपले पुढील शिक्षण पूर्ण केले. लोकमान्य टिळक हे लहानपणापासूनच अत्यंत हुशार आणि धाडसी होते. त्यामुळे त्यांचे शाळेतील किस्सेही प्रसिद्ध आहे. एकदा शाळेत कोणीतरी शेंगा खाल्ल्यामुळे शिक्षक सर्व मुलांना मारायला लागले आणि टरफले उचलण्यास सांगितले तेव्हा लोकमान्य टिळक म्हणाले, ‘मी



शेंगा खाल्ल्या नाहीत, तर मी टरफले उचलणार नाही’.

लोकमान्य टिळकांनी आपल्या राजकीय आयुष्यात उदारमतवादी विचारांचा तीव्र निषेध केला. स्वराज्य मिळविण्यासाठी आणि इंग्रजांना देशातून घालवून लावण्यासाठी लोकमान्य टिळकांना जोरदार बंड करायचे होते त्यामुळे त्यांनी स्वदेशी चळवळीला आणि बंगालच्या फाळणीच्या वेळी ब्रिटीश वस्तूंवर बहिष्कार घालण्याचे समर्थन केले. १९०७ मध्ये काँग्रेसच्या राष्ट्रीय अधिवेशनामध्ये गटात वाद निर्माण झाला आणि दोन स्वतंत्र गटात विभागणी झाली. त्यावेळी लोकमान्य टिळकांनी सरकारच्या धोरणाला कडाडून विरोध केला. ब्रिटिशांविरुद्ध चिथावणीखोर लेख टिळकांनी लिहीत चापेकर बंधूना प्रेरणा दिली यामुळे लोकमान्य टिळकांवर देशद्रोहाचा खटला चालवून सहा वर्षे हद्दपारी ची शिक्षा सुनावण्यात आली. यामुळे त्यांना भारतीय असंतोषाचे जनक असे सुद्धा म्हणतात. मंडालेच्या तुरूंगात सहा वर्ष त्यांना पाठविण्यात आले तिथे त्यांनी गीता रहस्य हे पुस्तक लिहिले. गीतारहस्यातील त्यांचे विचार आधुनिक भारतातील एक श्रेष्ठ तत्त्वज्ञान ठरले आहे.

सामाजिक जागृती संदर्भात लोकांमध्ये एकतेची भावना निर्माण व्हावी या उद्देशाने सार्वजनिक गणेशोत्सव आणि शिवजयंती उत्सवाला सुरूवात लोकमान्य टिळकांनी केली. तसेच लोकमान्य टिळकांनी लोकांच्या समस्या समजून घेण्यासाठी आणि आपल्या हक्कांसाठी लढा देता यावा यासाठी १८८१ मध्ये केसरी आणि मराठा या दोन वृत्तपत्रांची सुरूवात केली आणि त्यातून अन्यायाविरूद्ध वाचा फोडली. ही दोन्ही वृत्तपत्र त्याकाळी तुफान प्रसिद्ध झाली. १८८५ मध्ये पुणे येथे फर्ग्युसन महाविद्यालय सुरू केले. १९१६ मध्ये डॉ. अँनी बेझंट यांच्या सहकार्याने होमरूल लीग या संघटनेची स्थापना लोकमान्य टिळकांनी केली या मागचा उद्देश म्हणजे आपल्या राज्याचे प्रशासन आपणच करावे अर्थात स्वशासन करावे यासाठी याची स्थापन त्यांनी केली. ‘स्वराज्य हा माझा जन्मसिध्द हक्क आहे आणि तो मी मिळवणारच’ अशी गर्जना करणाऱ्या राष्ट्रभक्ताचे निधन १ ऑगस्ट १९२० रोजी मुंबई येथे झाले. अशा या प्रखर राष्ट्रभक्ताच्या जयंतीनिमित्त त्यांच्या कार्यास शतशत नमन.

## पुसद मध्ये जागतिक आदिवासी दिनानिमित्त विदर्भ स्तरीय युवा महोत्सव साजरा होईल

### आदिवासी विकास परिषद जिल्हाध्यक्ष - अँड. सुनील ढाले

**दैनिक युवक आधार**
**उमरखेड तालुका प्रतिनिधी राजू गायकवाड**

१९९४ मध्ये संयुक्त राष्ट्रसंघाने ९ ऑगस्ट हा दिवस ‘जागतिक आदिवासी लोकांचा आंतरराष्ट्रीय दिवस’ म्हणून घोषित केला. हा दिवस साजरा करण्यामागचा मुख्य उद्देश म्हणजे जगातील आदिवासी समाजाचे जीवनमान सुधारणे आणि त्यांच्या समस्या, गरजा आणि हक्क याकडे लक्ष वेधणे आहे जगभरातील आदिवासी लोकांच्या हक्कांचे संरक्षण करणे, त्यांच्या सांस्कृतिक, सामाजिक, आर्थिक आणि राजकीय जीवनातील योगदानाला मान्यता देणे व जागरूकता निर्माण करणे हा उद्देश या दिवसाचा आहे हा दिवस पुसद तालुक्यात धूमडाक्यात साजरा करण्यासाठी अखिल भारतीय आदिवासी विकास परिषद यांच्या माध्यमातून विश्राम गृह पुसद येथे बैठकीचे आयोजन करण्यात आले होते यावेळी नारायण कऱ्हाळे, राजेश ढगे, अँड सुनील ढाले,दादाराव चिरंगे, अँड रामदास भडगे, राजु तडसे,विजय इंगळे, अर्जुन हगवणे, आनंदराव वाघमारे, शालिक बेले, भगवान भोरकडे, गजानन फोफसे, बबलू मळघने,जगदीश शिंदे,संतोष दुमारे, संतोष गारुळे, प्रकाश मोरे, गजानन टारफे,गणेश भुजाडे, समाधान बळी, विजय इंगळे, संदीप आढाव,शिवाजी,सुरज मोहकर, गणेश सांडवकर, रवी वाळके, बबन धनवे,काशिनाथ बोके, रंगराव खोकले, संतोष खुडे,राजू गायकवाड,तातेराव भडगे, राम कोठुळे इत्यादी उपस्थित होते.



# राज्यातील शेतकरी अनेक समस्यांनी त्रस्त, तर कृषीमंत्री मात्र ‘जंगली रमी’ खेळण्यात व्यस्त.

**दैनिक युवक आधार**
**उपजिल्हा प्रतिनिधी वाशिम गजानन पवार पाटील.**



सध्या राज्यात शेतकऱ्यांची स्थिती अतिशय गंभीर आहे. आत्महत्या, पीकविमा, अनुदानाचा अभाव, बियाण्यांची टंचाई आणि हवामानाचा फटका अशा अनेक संकटांनी शेतकरी गांजलेला असताना राज्याचे कृषीमंत्री मात्र विधान भवनामध्ये ‘जंगली रमी’ खेळण्यात गुंग असल्याचे प्रकार समोर येतात, तेव्हा जनतेच्या मनात संताप उसळतो.अलीकडेच पार पडलेल्या पावसाळी अधिवेशनात जनतेच्या हिताचे ठोस निर्णय अपेक्षित होते. मात्र अधिवेशनात काही आमदार आणि मंत्र्यांनी दाखवलेले वर्तन हे केवळ लाजिरवाणेच नव्हे तर लोकशाही व्यवस्थेचा अपमान करणारे आहे.

कोणी आमदार कॅन्टीनमधील कर्मचाऱ्याला ठोसा मारतो, तर कोणी भर सभागृहात ‘शाळकरी’ पद्धतीने एकमेकांची टवाळी करतो. काही आमदारांचे समर्थक विधान भवनाच्या आवारातच हाणामारी करतात, तर कोणी पोलीस अधिकाऱ्याला ‘औकात दाखवतो’. आणि आता तर एका मंत्र्याने विधानसभेत बसून जुगाराच्या खेळात रममाण झाल्याचे समोर आले आहे – हे सगळं लोकप्रतिनिधींना शोभणारं आहे का?शेतकऱ्यांचे प्रतिनिधी असलेल्या कृषी मंत्र्यांनी त्यांच्यासाठी लढा द्यायला हवा, त्यांचे प्रश्न सभागृहात मांडायला हवेत. पण याच्या ऐवजी त्यांनी जर जुगार खेळण्यात वेळ घालवला, तर त्यावरून त्यांच्या कार्यक्षमतेबाबतच नव्हे, तर नैतिकतेबाबतही प्रश्नचिन्ह निर्माण होते.शेतकऱ्यांना मदत मिळवून देण्याऐवजी राजकीय नेते आणि अधिकारी केवळ पंचनामे आणि सर्वेक्षणाच्या नावाखाली वेळकाढूपणा करत असतील, तर मग या सगळ्याचा उपयोग काय? शेवटी पीकविमा कंपन्यांवर जबाबदारी ढकलून शेतकऱ्यांच्या हातात काहीच राहत नाही.ही घटना आपल्याला एक गोष्ट शिकवते – की लोकप्रतिनिधींनी अधिक जबाबदारीने, सजगतेने आणि नैतिकतेने वागणे अत्यंत गरजेचे आहे. अन्यथा लोकशाहीवरील विश्वास ढासळायला वेळ लागणार नाही.

बातमीमध्ये फोटो खाली नाव घेणे..

नॅशनॅलिस्ट कंजूमर प्रोटेक्शन ऑर्गनायझेशन जिल्हाध्यक्ष प्रताप नागरे वाशिम.

# महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांच्या वाढदिवसानिमित्त पवनी येथे रक्तदान शिबीर कार्यक्रम संपन्न

**दैनिक युवक आधार**
**संजीव भांबोरे**

भंडारा - दिनांक 22 जुलै 2025 रोज मंगळवार ला महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त भंगाराम माता मंदिर नागपूर रोड पवनी येथे भारतीय जनता पार्टी पवनी शहर आणि पवनी ग्रामीणच्या वतीने भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. ह्या निमित्ताने रक्तदान करणारे रक्तदाते श्री. संतोष घोशीकर,राजेंद्र फुलबांधे,गिरीश मुंडले, वाल्मीक नखाते, ओमप्रकाश हटवार,तुषार शहारे, अनिल येटरे, मंगेश देशमुख, धनराज सिंहगडे, रवींद्र जिभकाटे,श्रीकांत भोगे, विशाल शहारे, प्रमोद तांबुडकर, प्रशांत



भाजीपाले,सुरज बावणे, सचिन वैद्य, इंद्रजीत जिभकाटे, अजय वाकडीकर, पियुष फुलबांधे, अक्षय भोयर, सौरभ बांगरे, उमेश बावनकर, डेमेश्वर पडोळे, अभिषेक बिलवणे, राष्ट्रवादी चे नेते तोमेश्वर पंचभाई, हरिहर नागपुरे, विपिन तलमले, मनीष सुभेदार, शुभम भुरे, दिनेश इनकणे, देवेंद्र लांजेवार, वैभव बोंधळे, गजानन जीभकाटे, मनीष खांदाळे, गिरीश नखाते, नारायण नखाते, पंकज लांजेवार, सुरेश बोरकर,शुभम मेश्राम,विलास बाळबुद्धे इत्यादींनी रक्तदान केले. ह्यावेळी भाजपा भंडारा जिल्हा अध्यक्ष आशुभाऊ गोंडाने,भाजपा जिल्हा महामंत्री मयूर बिसेन,पवनी ग्रामीण मंडळ अध्यक्ष भाजपा तिलकजी वैद्य आणि प्रकाश कुर्जेकर, पवनी शहर भाजपा अध्यक्ष संदीप नंदरधने,माजी तालुकाध्यक्ष मोहनभाऊ सुरकर,महामंत्री सुरेश अवसरे, महामंत्री दत्तू मुनरतीवार,महामंत्री शेखर कळंबे, महामंत्री राकेश पाखमोडे, डॉ.संदीप खंगार, शिवाभाऊ मुनघाटे सरपंच अड्याळ, एड. राहुल बावणे एड.खेमराज जीभकाटे, लोकेश दळवे, राजू नार्देलवार,देवा धारगावे,मनोज खानकुरे सरपंच फनुली,यादव मेंगरे महामंत्री, सतीश घरडे, सतीश बघेले,चेतन भोंबले,भास्कर उरकुडकर, जागदेव मुंडले, दिनेश कोरे, हरिचंद्र भेंढारकर, शेखर बावनकर, संघर्ष अवसरे,राजेश तावेडे, हिरालाल वैद्य, विलास डाहारे, सुनील घावडे, विकास टेंभुर्णे अल्पसंख्यांक सेल अध्यक्ष, राजेश येलसट्टीवार,चिंतामण काटेकाये, रघुत्तम कुर्जेकर, यादव

धनजुडे, युगल भुरे, रोहित नागपुरे, गिरीश नखाते, रुपेश कोरेकर, निखिल कावळे, इत्यादी भाजपा कार्यकर्ते व पदाधिकारी उपस्थित होते. सर्व रक्तदात्यांचे भाजपा पवनी शहर व भाजपा ग्रामीण पवनी च्या वतीने सर्वांचे सुरेश अवसरे यांनी मनःपूर्वक आभार मानले.

# लाचलुचपत प्रकरणी पोलिसावर कारवाई

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

50 हजारांची लाच स्वीकारताना खाजगी इसमासह पनवेल शहर पोलीस ठाण्यातील पोलीस उपनिरीक्षकावर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने कारवाई केली. या प्रकरणी 21 जुलै रोजी पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. यातील तक्रारदार यांच्या वडिलांच्या विरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल आहे. या गुन्ह्यामध्ये कलमांची वाढ करून वडिलांचा अंतरिम जामीन ना मंजूर करून त्यांना अटक करेन अशी भीती पोलीस उपनिरीक्षकाकडून घालण्यात आली. आणि त्यांना अटक न करण्यासाठी सचिन वामन वायकर (पोलीस उपनिरीक्षक पनवेल) यांनी एक लाख रुपयांची मागणी केली. याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे 21 जुलै रोजी तक्रार करण्यात आली. तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने तडजोडीअंती 50 हजार रुपये लाचेची रक्कम स्वीकारण्याचे मान्य केल्याचे पडताळणी दरम्यान निष्पन्न झाले. त्यानुसार छत्रपती शिवाजी महाराज चौक, पनवेल येथे सापळा रचण्यात आला. यावेळी सचिन वायकर यांनी मागणी केल्याप्रमाणे लाचेची रक्कम 50 हजार रुपये वायकर यांनी त्यांच्या वॅगन आर कारमध्ये खाजगी ईसम रवींद्र उर्फ सचिन सुभाष बुट्टे (वय 30 रा. करंजाडे, सेक्टर एक) यांच्यामार्फत स्वीकारली. 21 जुलै रोजी रात्री साडेदहाच्या सुमारास सचिन वायकर आणि खाजगी ईसम रवींद्र गुट्टे यांना रंगेहात पकडण्यात आले. या प्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

# पोलिस उपनिरीक्षक सचिन वाईकर यांना 50 हजाराची लाच घेताना अटक

**दैनिक युवक आधार**
**पनवेल ( वार्ताहर )**



अंतरिम जामीन नामंजूर करून वडिलांना अटक करेन अशी भिती दाखवत लाचेची मागणी करत 50 हजाराची लाच घेताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने पनवेल शहर पोलिस ठाण्याचे पोलिस उपनिरीक्षक सचिन वाईकर यांना अटक केली आहे. तक्रारदार यांचे वडिलांचे विरुध्द पनवेल शहर पोलीस ठाणे येथे दाखल असलेल्या गुन्हयामध्ये कलम वाढ करून, तक्रारदार यांचे वडिलांचा अंतरिम जामिन नामंजूर करून त्यांना अटक करेन अशी भिती घालत असलेबाबत व अटक न करणेकरीता पनवेल शहर पोलिस ठाण्याचे पोलिस उपनिरीक्षक सचिन वामन वाईकर यांनी १ लाख रूपयांची मागणी करीत असल्याबद्दल तक्रार लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे प्राप्त झाली होती.त्यानुसार दिनांक २१ जुलै रोजी मारूती कुशन, छत्रपती शिवाजी महाराज चौक पनवेल येथे सापळा लावला असता पोलिस उपनिरीक्षक सचिन वामन वाईकर यांनी मागणी केल्याप्रमाणे लाचेची रक्कम 50 हजार रूपये सचिन वाईकर यांनी त्यांचे व्हॅगन आर कारमध्ये खाजगी इसम रविंद्र उर्फ सचिन सुभाष बुट्टे यांचेमार्फत स्वीकारल्याने आढळून आले.त्याचवेळी त्यांना रंगेहाथ पकडण्यात आले. लाचलुचपत विभाग रायगडच्या पोलिस उपअधिक्षक सरिता भोसले, पोलिस निरीक्षक निशांत धनवडे, सहाय्यक फौजदार विनोद जाधव,पोलिस हवालदार महेश पाटील,पोलिस शिपाई नवदीत नांदगावकर यांनी ही कारवाई केली आहे.

# स्थानिक गुन्हे शाखा व रिसोड पोलीस स्टेशन यांची संयुक्त कारवाई.

## एकूण 10 घरफोडीचे गुन्हे उघड करून आरोपीकडून एकूण 11.17.740. रुपयांचा मुद्देमाल केला जप्त.

**दैनिक युवक आधार**
**उपजिल्हा प्रतिनिधी वाशिम गजानन पवार पाटील.**

मा. पोलीस अधीक्षक वाशिम यांनी वाशिम जिल्ह्यातील पोलीस स्टेशनला दाखल घरपोडीच्या गुन्ह्यातील आरोपींचा शोध घेऊन गुन्हे उघडकीस आणण्याचे सूचना स्थानिक गुन्हे शाखा तसेच सर्व पोलीस स्टेशन प्रभारी अधिकारी यांना दिल्या होत्या. त्या अनुषंगाने रिसोड पोलीस स्टेशन जिल्हा वाशिम येथे दिनांक 1.03.2025. रोजी. फिर्यादी राजेश श्रावण बलकार. रा. मोप. ता. रिसोड. जी.वाशिम. यांचे जबानी रिपोर्ट वरून अप क्र.104./2025.कलम.305. ए.331.4. बीएनएस. अन्वये दाखल गुन्ह्यातील आरोपींचा



शोध घेऊन सदर गुन्ह्यात स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने आरोपी 1. ईश्वर उर्फ प्रभुराज युवराज पवार.. वय 25. वर्ष रा. बीबी.ता लोणार .जी बुलढाणा.2. श्यामराव रामकिसन पवार. वय 35. वर्ष. जांभरुण नावजी. ता. वाशिम जि वाशिम. यांचा पीसीआर घेऊन सखोल विचारपूस करून आधुनिक व तांत्रिक पद्धतीने तपास केला असता आरोपींनी पोलीस स्टेशन रिसोड.04. मालेगाव.02. वाशिम ग्रामीण 01. मंगरूळपीर.01. व कारंजा ग्रामीण.02. असे एकूण 10. गुन्ह्याची कबुली दिली. व नमूद आरोपी यांच्याकडून एकूण 112. ग्रॅम.(11.2. तोळे) सोने व 500. ग्रॅम 50 तोळे.चांदी. एक मोबाईल एक मोटर सायकल व नगदी 4500.रू असा एकूण किंमत.11.17.740. रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या आरोपीची टोळी असून आणखी बुलढाणा व हिंगोली जिल्ह्यातील 03. आरोपी सहभागी आहेत.हि टोळी महाराष्ट्रात व इतर राज्याबाहेर सुद्धा सक्रिय असल्याने सामान्य जनता यांचे घरफोडी सारख्या कृत्यामुळे भयभीत झाली होती. उर्वरित आरोपींचा शोध घेण्यासाठी पथके नेमण्यात आली आहेत. सदरची कामगिरी. मा. पोलीस अधीक्षक वाशिम. अनुज तारे. अप्पर पोलीस अधीक्षक लता फड. सहाय्यक पोलीस अधीक्षक नवदीप अग्रवाल. उपविभाग वाशिम स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक. प्रदीप परदेशी. यांच्या मार्गदर्शनाखाली रिसोड पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक श्री रामेश्वर चव्हाण. यांच्या नेतृत्वाखाली सहायक पोलीस निरीक्षक जगदीश बांगर. पोलीस उपनिरीक्षक सचिन गोखले. शेखर मास्कर. म स पो उपणी. मीना पाथरकर. पोलीस हवालदार प्रशांत राजगुरू. दीपक सोनोने. गजानन झगरे. पोलीस अमलदार विनोद घनवट. रवी अढागळे. परमेश्वर भोने. देविदास काळबांडे. संदीप दुतोंडे. दीपक घुगे. गजानन गोटे सुरज खडके. चापो हवा. साहेबराव मुकाडे. मपोसी. योगिता भस्मे. कांचन डोंगरदिवे. तसेच स्थानिक गुन्हे शाखा व रिसोड पोलिसांच्या पथकाने कारवाई केली आहे.

# पनवेल महानगरपालिका क्षेत्रामध्ये सुका कचरा आणि ओला कचरा गोळा करण्यासाठी वेगवेगळ्या गाड्या सुरु कराव्यात - शेकाप कार्याध्यक्ष गौरव पोरवाल

**दैनिक युवक आधार**
**पनवेल वार्ताहर**

पनवेल महानगरपालिका क्षेत्रामध्ये सुका कचरा आणि ओला कचरा गोळा करण्यासाठी वेगवेगळ्या गाड्या सुरु कराव्यात अशी मागणी पनवेल महानगरपालिकेचे आयुक्त मंगेश चितळे यांच्याकडे शेकाप कामोठे कार्याध्यक्ष गौरव पोरवाल यांनी निवेदनाद्वारे केली आहे

यावेळी कार्याध्यक्ष गौरव पोरवाल यांच्यासह नितीन पगारे ,रमेश गोरे आदी पदाधिकारी उपस्थित होते . यावेळी बोलताना कार्याध्यक्ष गौरव पोरवाल यांनी सांगितले की,आपल्या पनवेल महानगरपालिका क्षेत्रामध्ये सुका कचरा आणि ओला कचरा गोळा करण्यासाठी जोरदार मोहीम चालू आहे, परंतु त्याचा काही उपयोग होत नाही आहे, कारण कि तो कचरा (सुका आणि ओला) एकाच गाडी मध्ये एकत्र केला जातो. त्यामुळे सुका कचरा आणि ओला कचरा दोन वेगवेगळ्या गाड्यांमध्ये



घेऊन जायला हवा आणि कंपोस्ट बनविण्यासाठी प्रत्येकी १० सोसायटी मध्ये एका मशीन चे वाटप केले पाहिजे, ज्यामध्ये जनतेचा सहभाग या कामासाठी महानगर पालिकेला मिळू शकतो महानगरपालिकेला आमचा पाठिंबा नेहमीच असेल. महानगरपालिकेचे एक सकारात्मक पाऊल समाजाला स्वस्थ बनवू शकतो. तरी लवकरात लवकर ही सेवा सुरु करावी अशी मागणी केली आहे .

# देवगिरी बँकेला शेड्युल बँकेचा बहुमान; हरिभाऊ बागडे नानांच्या भेटीने ऐतिहासिक क्षण अधिक स्मरणीय

**दैनिक युवक आधार**
**आसाराम वीरकर**

**मराठवाडा विभाग संपादक** – मराठवाड्याच्या सहकार क्षेत्रातील अग्रेसर संस्था असलेल्या देवगिरी बँकेला नुकताच ‘शेड्युल बँक’ म्हणून दर्जा प्राप्त झाला आहे. ही केवळ बँकेसाठी नव्हे, तर संपूर्ण मराठवाड्यासाठी गौरवाची बाब आहे. या ऐतिहासिक यशानि मित्त बँकेचे माननीय संस्थापक संचालक, मार्गदर्शक व सध्या राजस्थानचे राज्यपाल असलेले महामहीम श्री. हरिभाऊ बागडे (नाना) यांची बँकेच्या सर्व संचालकांनी आज स्नेह भेट घेतली आणि त्यांच्याकडून आशीर्वाद घेतले. या भेटीत नानांनी बँकेच्या प्रगतीची उत्सुकतेने चौकशी केली, सर्व संचालक मंडळाचे अभिनंदन केले आणि भविष्यासाठी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या. या प्रसंगी नानांच्या कार्यशैलीचा, व्यवस्थापन कौशल्याचा आणि कठोर निर्णय क्षमतेचा गौरव करण्यात आला. संचालक मंडळाने नानांच्या कार्यकाळातील किस्से आठवत त्यांच्या कडक वसुलीच्या कार्यपद्धतीचे, गरजूंना दिलेल्या धाडसी मदतीचे, व सहकार तत्त्वांवर चालवलेल्या शिस्तबद्ध संस्थेचे वर्णन करताना त्यांच्या नेतृत्वात बँकेने घेतलेल्या भक्कम पावलांची उजळणी केली. या संवादातून एक प्रेरणादायी प्रशिक्षणच संचालकांना मिळाल्याची भावना सर्वांनी व्यक्त केली. नानांनी या वेळी सांगितले की, जेव्हा बँकेची स्थापना केली, तेव्हा माझं स्वप्न होतं – ही संस्था केवळ आर्थिक व्यवहारापुरती मर्यादित राहू नये, तर सामान्य माणसाच्या जीवनात बदल घडवणारी यंत्रणा ठरावी. आज शेड्युल बँकेचा दर्जा म्हणजेच त्या स्वप्नपूर्तीचा एक महत्त्वपूर्ण टप्पा आहे. संचालक मंडळानेही या यशाचा श्रेय नानांच्या दूरदृष्टीला, संस्थेच्या सातत्यपूर्ण









प्रगतीत योगदान देणाऱ्या सर्व माजी व सध्याच्या संचालकांना, तसेच कर्मचाऱ्यांच्या मेहनतीला दिला.

या विशेष प्रसंगी बँकेचे माजी अध्यक्ष मा. राम भोगले सर, सध्याचे अध्यक्ष किशोर शितोळे, उपाध्यक्ष उमेश दाशरथी, संचालक सजनराव मते, नागनाथ आप्पा काजळे, जयश्रीताई किवळीकर, अमितताई लेकुरवाळे, वाहेगावकर ताई, प्रज्ञा तल्हार, डॉ. क्षमाताई खोब्रागडे, सुरेश जगाडे, तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी प्रवीण नांदेडकर, उपमुख्य कार्यकारी अधिकारी रुपेंद्र कोयाळकर, दत्ता शिंदे साहेब व कर्मचारी संघाचे अध्यक्ष भारत मस्के आदी मान्यवर उपस्थित होते.

आज देवगिरी बँक ही केवळ आर्थिक संस्था राहिलेली नसून, सहकार तत्त्वांवर उभा असलेला विश्वासाचा वटवृक्ष ठरली आहे. शेड्युल बँकेचा दर्जा म्हणजे संस्थेच्या शिस्त, पारदर्शकता, प्रामाणिकपणा आणि लोकाभिमुखतेचा राष्ट्रीय स्तरावर झालेला सन्मान आहे.

बँकेने यावेळी आवाहन केले की, आपणही देवगिरी बँक कुटुंबाचा भाग व्हा आणि आपल्या आर्थिक उन्नतीसाठी या संस्थेच्या विश्वासार्ह सेवांचा लाभ घ्या.

ही घटना म्हणजे मराठवाड्याच्या सहकार चळवळीचा सुवर्णक्षण आहे. हरिभाऊ बागडे नानांचे स्वप्न, आजच्या कार्यकारिणीची निष्ठा आणि सभासद-ग्राहकांचा अढळ विश्वास – या त्रिसूत्रीच्या बळावर देवगिरी बँक भविष्यात अधिक बहरत जाईल, अशीच सर्वत्र भावना आहे.

# वरपगाव ग्राम पंचायत उपसरपंच पदी बाबुराव विष्णू देशमुख हेच कायम राहतील.

## माननीय उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठाचे आदेश

**दैनिक युवक आधार**

**पाटोदा (प्रतिनिधी)** - वरपगाव ग्राम पंचायतची निवडणूक २०२२ मध्ये होऊन सरपंचाची निवड थेट मतदारातून करण्यात आली होती व उर्वरित नऊ सदस्यासाठी निवडणूक होऊन विलास सुब्बाराव पवार हे एस.टी.प्रवर्गातून सदस्यपदी निवडून आले होते. त्या नंतर त्यांची ग्राम पंचायत वरपगाव उपसरपंचपदी निवड झाली होती. परंतु विलास सुब्बाराव पवार यांनी जातीचे पडताळणी वैधता प्रमाणपत्र विहित मुदतीत सादर न केल्यामुळे जिल्हाधिकारी बीड यांनी २०/१/२०२५ रोजी विलास पवार यांचे ग्राम पंचायत सदस्यपद रद्द करून ग्राम पंचायत सदस्य राहण्यात अनाहर ठरवले होते. दरम्यानच्या काळामध्ये सदरील उपसरपंचाचे पद रिकामे झाल्यामुळे सदरील पद नियमानुसार भरण्याचे आदेश दिनांक १८/०३/२०२५ रोजी जिल्हाधिकारी बीड यांनी तहसीलदार केज यांना कळविले होते. त्या अनुषंगाने दिनांक १९/०३/२०२५ रोजी तहसीलदार केज यांनी उपसरपंच निवडीबाबत निवडणूक अधिकाऱ्याची नेमणूक केली व सदरील निवडणुक अधिकाऱ्यांनी दिनांक २७/०३/२०२५ रोजी उपसरपंच पदाच्या निवडीची सभा घेतली व त्या मध्ये बाबुराव विष्णू देशमुख बहुमताने उपसरपंच पदासाठी निवडून आले होते आणि ते उपसरपंच म्हणून काम पाहत होते. परंतु दिनांक ३०/०४/२०२५ रोजी महाराष्ट्र शासनाने अध्यादेश काढून ग्राम पंचायतच्या सदस्याचा राखीव जागा व निवडून आलेल्या व्यक्तीने वैधता प्रमाणपत्र सादर करण्याची मुदत १२ महिने वाढवून दिली. त्या नंतर विलास सुब्बाराव पवार यांनी माननीय उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद मध्ये याचिका क्रमांक ७९०९/२०२५ दाखल करून शासनाच्या दिनांक ३०/०४/२०२५ च्या अध्यादेशाप्रमाणे जात पडताळणी प्रमाणपत्र सादर करण्यासाठी मुदत वाढून दिलेली असून जिल्हाधिकारी बीड यांचे अपात्रतेचे आदेश रद्द करण्यात यावे अशी याचीका दाखल केली होती. सदरील याचीकेची सुनावणी दिनांक ३०/०७/२०२५ रोजी माननीय उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठ मध्ये होऊन माननीय उच्च न्यायालयाने जिल्हाधिकारी बीड यांचे २०/०१/२०२५ चे आदेश रद्द केले व विलास सुब्बाराव पवार यांची ग्राम पंचायत वरपगावचे सदस्यपद कायम ठेवले. परंतु त्या नंतर विलास सुब्बाराव पवार यांनी जिल्हाधिकारी बीड यांच्या कडे अर्ज देऊन वरपगाव ग्राम पंचायतचे उपसरपंच म्हणून विलास पवार हे कायम राहिलेले आहे व त्यांना उपसरपंच पदाचा पदभार देण्यात यावा असा अर्ज केला होता व त्या अनुषंगाने विलास पवार उपसरपंच पदाचा कार्यभार घेण्याच्या तयारीत असताना, कार्यरत उपसरपंच बाबुराव विष्णू देशमुख यांनी माननीय उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठ मध्ये याचीका क्रमांक ७९०९/२०२५ मध्ये पुनर्विलोकन अर्ज क्रमांक १६३/२०२५ अँड.नरसिंह एल.जाधव यांच्या मार्फत दाखल करून माननीय उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठच्या दिनांक ०३/०७/२०२५ च्या आदेशामध्ये बदल करण्यात यावे त्या साठी मा.उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठाच्या निदर्शनास आणून दिले की दिनांक ३०/०४/२०२५ ग्राम विकास विभागाचे अध्यादेशामध्ये जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी मुदतवाढ जरी करून दिली असली तरी एखादा व्यक्ती सदस्य म्हणून अपात्र झाला असेल व तो सरपंच अथवा उपसरपंच असेल व त्या नंतर सदरील सरपंच व उपसरपंच पद नियमाप्रमाणे पोटनिवडणूक घेण्यात आली असेल तर वैधता प्रमाणपत्र मुदतीत सादर न करणाऱ्या व्यक्तीला उपसरपंच पद मिळणार नाही फक्त सदस्य म्हणूनच राहता येईल. तसेच या प्रकरणात विलास सुब्बाराव पवार यांनी या पूर्वी याचिका क्रमांक २३१६/२०२५ माननीय उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद मध्ये दाखल केली होती व त्या मध्ये जिल्हाधिकारी बीड यांचे आदेश आव्हानित केले होते. सदरील याचिका नामंजूर करण्यात आली होती परंतु या बाबत विलास सुब्बाराव पवार यांनी नवीन याचिकेमध्ये हि माहिती दिली नाही. त्या मुळे पूर्वीच्या आदेशामध्ये बदल करण्यात येऊन अर्जदार उपसरपंच बाबुराव विष्णू देशमुख यांनाच वरपगाव ग्राम पंचायतचे उपसरपंच म्हणून ठेवावे व काम करू द्यावे अशी विनंती केली होती वरील पुनार्विलोकन अर्जाची सुनावणी दिनांक १८/०७/२०२५ रोजी माननीय उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबादचे न्यायमूर्ती मनीष पितळे व वाय.जी.खोब्रागडे यांच्या पुढे झाली असता माननीय उच्च न्यायालयाने दोन्ही बाजूचा युक्तिवाद ऐकूण बाबुराव विष्णू देशमुख यांची उपसरपंच पदी झालेली निवड कायम ठेवली असून विलास पवार यांना उपसरपंच पदी पुनरस्थापित करता येणार नाही असा निकाल दिला. उपसरपंच बाबुराव देशमुख यांच्या वतीने अँड.नरसिंह एल.जाधव व अँड.महेश पी.काळे यांनी काम पाहिले तर शासनाच्या वतीने अँड.व्ही.एम.कांगणे यांनी काम पाहिले तर विलास पवार यांच्या वतीने अँड.एम.के.भोसले यांनी काम पाहिले.